

मुरूड : थर्टीफर्स्टसाठी आलेल्या पर्यटकांनी समुद्रकिनारी मावळत्या सूर्याच्या साक्षीने सरत्या वर्षाला अखेरचा निरोप दिला. त्यानंतर रात्री १२ वाजता नववर्षाचे स्वागत केले. (छाया : सुधीर नाझरे)

रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक १६५
www.ramprahar.com
सोमवार, १ जानेवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

स्वच्छ माझा महाराष्ट्र अभियान राज्यभर राबवणार -मुख्यमंत्री/२
'अंनिस'तर्फे चला व्यसनाला बदनाम करूया अभियान/६
मुंबई-गोवा महामार्ग जाम; वाहनांच्या लांब रांगा/७

(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

# भारत आत्मविश्वासाने भरलेला

## ■ २०२४मध्येही तोच उत्साह आणि वेग ठेवायचाय -पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा प्रत्येक कोपरा न कोपरा आत्मविश्वासाने भरलेला आहे. विकसित भारताच्या भावनेने, आत्मनिर्भरतेच्या भावनेने काठोकाठ भरलेला आहे. २०२४मध्येही आपल्याला तोच उत्साह आणि तोच वेग कायम ठेवायचा आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. ते रविवारी (दि.३१) मन की बात कार्यक्रमात बोलत होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, १४० कोटी भारतीयांच्या बळाच्या जोरावर या वर्षात (२०२३) आपल्या देशाने अनेक विशेष कामगिऱ्या बजावल्या आहेत. अनेकांनी पत्रे लिहून भारत पाचवी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था बनल्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे. सरते वर्ष आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष म्हणून साजरे करण्यात आले. यामुळे या क्षेत्रात काम करणाऱ्या स्टार्टअप्सना अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. दिवाळीतील विक्रमी व्यवसायाने सिद्ध केले की, प्रत्येक भारतीय व्होकल फॉर लोकल (स्थानिक उत्पादनांसाठी




आग्रह) या मंत्राला महत्त्व देत आहे.

अनेक खेळांमध्ये खेळाडूंनी केलेल्या उत्तम कामगिरीने देशाचे नाव मोठे केले आहे. आता २०२४मध्ये पॅरिस ऑलिम्पिक होणार आहे आणि त्यासाठी संपूर्ण देश आपल्या खेळाडूंना प्रोत्साहन देत आहे त्यांचे मनोधैर्य वाढवत आहे. नाटू-नाटू गाण्याला ऑस्कर, द एलिफंट व्हिस्परर्स डॉक्युमेंटरीला मिळालेल्या सन्मानाबद्दल कळल्यानंतर संपूर्ण देश आनंदाने मोहरून उठला. या माध्यमातून जगाने भारताची सर्जनशीलता पाहिली आणि त्यांना पर्यावरणाशी आपले नाते-जिव्हाळा समजला, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

जो देश नवोन्मेषाला महत्त्व देत नाही त्या देशाचा विकास थांबतो. भारत नवोन्मेषाचे मोठे केंद्र बनणे याचेच प्रतीक आहे व हेच दाखवते की आपण आता थांबणार नाही, असा विश्वास पंतप्रधान मोदींनी या वेळी व्यक्त केला.

### देश इनोव्हेशन हब होतोय!

भारत इनोव्हेशन हब होतोय हे या वस्तुस्थितीचे प्रतीक आहे की आपण थांबणार नाही. २०१५मध्ये आपण ग्लोबल इनोव्हेशन रँकमध्ये ८१व्या क्रमांकावर होतो. आज आपला क्रमांक ४०वा आहे. या वर्षी भारतात दाखल केलेल्या पेटंटची संख्या जास्त आहे, त्यापैकी सुमारे ६० टक्के हे देशांतर्गत निधीचे होते. या वेळी क्यूएस एशिया युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये सर्वाधिक भारतीय विद्यापीठांचा समावेश झालाय, अशी माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या वेळी दिली.





# जय श्रीराम! पनवेलमध्ये अक्षता कलश यात्रा उत्साहात

## ■ नागरिकांकडून जोरदार स्वागत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नववर्ष स्वागत समितीच्या माध्यमातून अक्षता कलश यात्रेचे आयोजन रविवारी (दि.३१) पनवेलमध्ये करण्यात आले होते. या धार्मिक कार्यक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कलश यात्रेत भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर सहभागी झाले होते.

प्रभू श्रीरामाचे भव्य दिव्य मंदिर अयोध्येत साकारत आहे. या मंदिरात २२ जानेवारी रोजी मूर्तीची प्रतिष्ठापना होणार आहे. त्याचे निमंत्रण देण्यासाठी घरोघरी रामभक्त फिरणार आहेत. त्या अनुषंगाने अयोध्येतून आलेल्या अक्षतांच्या कलशाची पनवेलमध्ये मिरवणूक काढण्यात आली. या यात्रेची सुरुवात कोळीवाड्यातील जरीमरी मंदिर येथून उत्साहपूर्ण वातावरणात झाली. या वेळी वाद्यांच्या गजरात फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. यासोबतच जय श्रीरामच्या गगनभेदी घोषणांनी संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते.





या कलश यात्रेत भाजपचे पनवेल शहराध्यक्ष अनिल भगत, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक राजू सोनी, मदन कोळी, प्रकाश बिनेदार, विक्रांत पाटील, प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका चारुशीला घरत, दर्शना भोईर, रूचिता लोंढे, नीता माळी, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सांस्कृतिक सेल जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, कोळी समाज अध्यक्ष हरिश्चंद्र भगत, युवा मोर्चा शहराध्यक्ष तथा मिडलक्लास हौसिंग सोसायटी मंडळाचे अध्यक्ष सुमित झुंजारराव, युवा नेते केदार भगत, अमित ओझे, भटके विमुक्त आघाडीचे संयोजक चंद्रकांत मंजुळे, रूपेश नायगावकर, प्रीतम म्हात्रे, स्वाती कोळी, कोमल कोळी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे नियोजन अमित ओझे व केदार भगत यांनी केले. वाल्मिकी नगर येथे यात्रेची समाप्ती झाली.

# ठाण्यात रेव्ह पार्टी उधळली

## पाच महिलांसह ९५ जण ताब्यात

**ठाणे : प्रतिनिधी**

नववर्षाच्या स्वागतासाठी सगळीकडे उत्साह असताना ठाण्यात रविवारी (दि.३१) एक मोठी कारवाई करण्यात आली. घोडबंदर परिसरातील गायमूख येथे एका रेव्ह पार्टीवर पोलिसांनी धाड टाकून ९५ तरुणांना ताब्यात घेतले. त्यात पाच महिलांचा समावेश आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दोन आयोजकांनी या पार्टीचे अवैधरित्या आयोजन केले होते. तरुण मुले पार्टीत सामील होती. त्यांनी अमली पदार्थ आणि मद्याचे सेवन केले होते तसेच मोठ्या आवाजात गाणी लावून धांगडधिंगा सुरू होता. तेथून गांजा, चरस, एलएसडी आणि एक्स्टसी गोळ्या जप्त केल्या आहेत. गुन्हे अन्वेषण विभागचे अतिरिक्त आयुक्त पंजाबराव उगळे म्हणाले की, आम्ही ९० पुरुष आणि पाच महिलांना ताब्यात घेतले आहे. त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात येणार असून त्याचा अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कारवाई करण्यात येईल.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये सहा मजुरांचा होरपळून मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगरच्या वाळूज औद्योगिक परिसरात हँडग्लोज बनवणाऱ्या एका कंपनीला रविवारी (दि.३१) मध्यरात्री भीषण आग लागली. या आगीत सहा परप्रांतीय मजूरांचा होरपळून मृत्यू झाला आहे, तर चार कामगारांनी स्वतःचा जीव वाचवला.

वाळूज एमआयडीसीतील सनशाइन इंटरप्राईजेस कंपनीत मध्यरात्री १२च्या सुमारास ही दुर्घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. मयत मजूर मूळचे बिहार राज्यातील आहेत.

# राजस्थान सरकारमध्ये जोराराम कुमावत कॅबिनेट मंत्री झाल्याने पनवेलमध्ये आनंद

**पनवेल : प्रतिनिधी**

राजस्थानमध्ये मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्या मंत्रिमंडळाचा शनिवारी (दि.३०) विस्तार झाला. या वेळी आपल्या सरकारमध्ये त्यांनी पनवेलकरांशी अनेक वर्षांचे नाते जुळलेल्या आमदार जोराराम कुमावत यांचा कॅबिनेट मंत्री म्हणून समावेश केला. त्यामुळे पनवेलमध्येही आनंद व्यक्त करण्यात आला.

मध्यमवर्गीय, साधी राहणी, कृषी व राजनिती तज्ज्ञ असलेले जोराराम कुमावत कॅबिनेट मंत्री झाल्याने पनवेलमध्ये कुमावत समाजात उत्साह पसरला असून याबद्दल समाजबांधवांनी फटाक्यांची आतषबाजी करून व मिठाई वाटून आनंदोत्सव साजरा केला. जोराराम कुमावत हे राजस्थानमधील सुमेरपूर विधानसभा मतदारसंघातून दुसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून आले आहेत.






मंत्री बनलेले जोराराम कुमावत यांचे पनवेलकरांशी अनेक वर्षांचे नाते जुळलेले आहे. त्यामुळे त्यांचा मंत्रिमंडळात समावेश झाल्याचे समजताच पनवेलच्या भाजप कार्यकर्त्यांनीही आनंद व्यक्त केला. महाराष्ट्र राज्याच्या २०१९मधील विधानसभा निवडणुकीच्या वेळी पनवेल विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रचारासाठी कुमावत हे एक महिना पनवेलमध्ये होते. त्यांनी भाजपचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रचारासाठी मतदारांच्या अनेक बैठका घेतल्या. मूळच्या राजस्थानमधून आलेल्या आपल्या समाजबांधवांना आमदार प्रशांत ठाकूर यांना मत देण्याचे आवाहन त्यांनी केले होते.

राजस्थान विधानसभा निवडणुकीपूर्वी १० दिवस आधी आमदार जोराराम कुमावत हे त्यांच्या मतदारसंघातील जे मतदार नोकरी-व्यवसायानिमित्त पनवेल परिसरात आले आहेत त्यांची भेट घेण्यासाठी आले होते. त्या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपच्या व्यापारी सेलचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष कमल कोठारी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक प्रवीण पाटील तसेच अमर चौधरी यांनी त्यांच्यासोबत खारघर, कळंबोली, खांदा कॉलनी व नवीन पनवेल परिसरात बैठका घेऊन त्यांना मतदान करण्यासाठी जाण्याचे आवाहन या मतदारांना केले होते.



**पनवेल : थर्टीफर्स्टच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात तरुणाई नशापान करीत असताना सुकापूर येथील दे धक्का मित्र मंडळाच्या युवकांनी समाजप्रबोधनपर देखावा उभारला. व्यसनामुळे किती विपरित परिणाम होतात, वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याने कसे अपघात घडतात या संदर्भात कापडी पुतळे व फलक लावून भाष्य करीत चंद्रकांत केणी व रोशन केणी यांनी व्यसनांपासून दूर राहण्याचा संदेश दिला.** (वृत्त पान २ वर..)

## तेहरीक-ए-हुर्रियत संघटनेवर केंद्राची बंदी

**श्रीनगर** : केंद्र सरकारने मोठा निर्णय घेत देशविरोधी कारवाया करणाऱ्या जम्मू-काश्मीरमधील तेहरीक-ए-हुर्रियत या संघटनेवर पाच वर्षांची बंदी घातली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी त्यांच्या एक्स (ट्विटर) अकाऊंटवर या संदर्भात माहिती दिली. देशविरोधी कारवायांमध्ये सहभाग घेणे, फुटीरतावादी शक्तींना बळ देणे, दहशतवादाला खतपाणी घालणे असे आरोप या संघटनेवर आहेत.

## महाराष्ट्राच्या मुख्य सचिवपदी डॉ. करीर

**मुंबई** : महाराष्ट्राच्या मुख्य सचिवपदी डॉ. नितीन करीर यांची रविवारी (दि.३१) नियुक्ती करण्यात आली. डॉ. करीर यांनी मनोज सौनिक यांच्याकडून पदभार स्वीकारला. डॉ. करीर यांनी एमबीबीएस पदवी घेतली असून त्यांची १९८८मध्ये भारतीय प्रशासकीय सेवेत निवड झाली होती.






# स्वच्छ माझा महाराष्ट्र अभियान राज्यभर राबवणार

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

प्रदूषण कमी करण्यासाठी पायाभूत सुविधांच्या विकासाबरोबरच पर्यावरण संवर्धनाकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी झाडे लावण्याबरोबरच स्वच्छता अभियान प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. मुंबई शहरात राबवले जाणारे स्वच्छता अभियान आता राज्यात सर्वत्र राबविण्यात येईल, असे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी (दि. ३१) येथे सांगितले.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज स्वच्छ माझा महाराष्ट्र या महास्वच्छता अभियानास प्रारंभ केला. त्यावेळी ते बोलत होते. गेटवे ऑफ इंडिया येथे झालेल्या या कार्यक्रमाला शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, आमदार सदा सरवणकर, माजी आमदार राज पुरोहित, उद्योगपती नादीर गोदरेज, मुंबई महापालिका आयुक्त आय. एस. चहल, अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे, डॉ. सुधाकर शिंदे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

**महास्वच्छता अभियान राज्यभर**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, ठाणे महापालिकेच्या कार्यक्षेत्रात स्वच्छता अभियानास प्रारंभ केला. त्यानंतर हे अभियान मुंबई शहरात राबवले. या अभियानाचा परिणाम खूप चांगला आहे. त्यामुळे हे अभियान आता राज्यात सर्वत्र राबविण्यात येणार आहे. स्वच्छ माझा महाराष्ट्र अभियानासाठी एक कार्य प्रणाली विकसित करण्यात आली आहे. त्यानुसार आपल्या कार्यक्षेत्रात स्वच्छता अभियान राबविण्यात यावे. या अभियानात लोकांना सहभागी करून घेण्यात यावे.

**स्वच्छता अभियान लोकचळवळ झाली**

मुंबई शहरात सुरू केलेल्या या अभियानात शाळा, महाविद्यालय विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, ज्येष्ठ नागरिक संघ, विविध प्रतिष्ठान सहभागी होत आहेत. यामुळे या अभियानाला लोकचळवळीचे स्वरूप येत आहे. मुंबई डीप क्लीन ड्राईव्हचे एक मॉडेल तयार झाले आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

**मुंबईत अर्बन फॉरेस्ट संकल्पना राबविणार**

विकास प्रकल्पामुळे तोडाव्या लागलेल्या झाडांचे पुनर्रोपण करणार आहे. मुंबईत रिकाम्या जागेवर झाडे लावली जाणार आहेत. मुंबई शहरात अर्बन फॉरेस्ट संकल्पना राबविण्यासाठी विचार सुरू आहे. ठाणे शहरातील कोपरी परिसरापासून गायमुख पर्यंत ग्रीन पॅच तयार केला जात आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सांगितले.

**▮ 'पाणबुडी प्रकल्प राज्याबाहेर जाणार नाही'**

*पाणबुडी प्रकल्प आपल्याच राज्याचा आहे, तो राज्याबाहेर जाणार नाही, उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याशी माझी चर्चा झाली असून दीपक केसरकर इथे माझ्यासोबतच आहेत, असे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाणबुडी प्रकल्प गुजरात जाणार नसल्याचे स्पष्ट केले. तसेच, विरोधकांच्या काळात कामे ठप्प होती, त्यामुळे त्यांना आरोप करण्याचा कुठलाही अधिकार नाही, असेही ते म्हणाले.*

**स्वच्छता कर्मचारी मुंबईचा खरा हिरो**

मुंबई शहरातील स्वच्छता कर्मचारी खरा हिरो आहे. कारण ते सकाळी लवकर उठून कामाला सुरुवात करतात. मुंबई स्वच्छ ठेवतात. या कर्मचाऱ्यांच्या वसाहती स्वच्छ ठेवण्यासाठी आमचा प्रयत्न आहे. सफाई कर्मचारी यांना विमा सुविधा पुन्हा सुरू करण्यात आली आहे. सफाई कर्मचारी यांच्या मुलांच्या उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले.

**स्वच्छता अभियान प्रभावीपणे राबवा, लोकप्रतिनिधींना सूचना**

मुंबई शहरात राबवले जाणारे स्वच्छता अभियान आता राज्यात सर्वत्र नेले जाणार आहे. हे अभियान आपल्या कार्यक्षेत्रात प्रभावीपणे राबवा, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विविध लोकप्रतिनिधींना केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरदृश्य प्रणाली व्दारे आमदार विद्या ठाकूर, आशिष शेलार, यामिनी जाधव, भारती लव्हेकर, प्रकाश सुर्वे, मंगेश कुडाळकर, दिलीप लांडे, कालिदास कोळंबकर यांच्याशी संवाद साधला.

तत्पूर्वी महापालिका आयुक्त आय. एस. चहल यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी मुंबई शहरात राबवल्या जात असलेल्या डीप क्लीन ड्राईव्हबाबत माहिती दिली. यावेळी स्वच्छता कर्मचारी संदीप पवार, शीला जाधव, मच्छिंद्र सावंत, स्वप्नील शिरवाळे, अर्चना मोरे यांचा सत्कार करण्यात आला.

अतिरिक्त आयुक्त सुधाकर शिंदे यांनी आभार मानले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वच्छता कर्मचारी यांच्याशी संवाद साधला. स्वच्छता कामात उपयोगी ठरणाऱ्या वाहनांच्या संचलनास हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केली.

# जय श्रीरामच्या घोषणांनी उरण शहर दुमदुमले!

## आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत कलश यात्रा

**उरण : वार्ताहर**

अयोध्यावरून आलेल्या पवित्र अक्षता कलश यात्रेचे उरण शहरात भक्तिमय वातावरणात आगमन झाले असून, उरण शहरात जय श्रीराम नामाच्या घोषणा देत, पवित्र मंत्रोच्चारांनी व ढोल ताशाच्या गजरात अक्षता कलशाचे स्वागत करण्यात आले. संपूर्ण देशात श्रीराम पूजा मंगल अक्षतः कलश दर्शनासाठी आणला जात आहे. मंगल अक्षता कलशातील अक्षतांचे वाटप १ ते १५ जानेवारी दरम्यान प्रत्येक घरोघरी करण्यात येणार आहे.

या मिरवणुकीला प्रभू श्रीरामाची भव्य प्रतिमा असलेला रथ, ढोल ताशांचा गजर, 'जय श्रीराम'चा जयघोष अशा आनंद आणि उत्साहपूर्ण राममय वातावरणात अयोध्येतील रामलल्लांची मूर्ती असलेल्या मंदिराच्या गर्भगृहात पूजन करून आलेल्या अक्षतांचे पूजन करीत उरण शहरात भव्य मंगल कलश यात्रा काढण्यात आली. या वेळी मोठ्या संख्येने नागरिक, महिला वर्ग यात्रेत सहभागी झाल्या होत्या. तसेच उरण शहरात प्रत्येक मंदिराच्या ठिकठिकाणी या मिरवणुकीचे भव्य स्वागत करण्यात आले.

या निमित्ताने मोरा कोळी वाडा राम मंदिर पासून बाईक रॅली काढण्यात आली होती. पुढे बोरी नाका, पाठारे आळी, कुंभारवाडा व पुढे पेन्शन पार्क येथे सांगता समारोप करण्यात आला. पेन्शनर पार्कपासून पद यात्रा सुरू करण्यात आली. पुढे गणपती मंदिर, राजपाल नाका, जरी मारी मंदिर, गांधी चौक, बाजारपेठ गणपती चौक येथील राम मंदिर येथे आरती घेण्यात आली व पद यात्रेचा सांगता समारोप करण्यात आला.


या वेळी आमदार महेश बालदी, भाजप उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह, शोभा कौशिक शाह, उपनगराध्यक्ष जयविन कोळी, भाजप जिल्हा चिटणीस चंद्रकांत घरत, उरण तालुका उपाध्यक्ष पंडित घरत, तालुका उपाध्यक्ष प्रकाश ठाकूर, सरचिटणीस सुनील पाटील, हितेश शाह, उरण शहर भाजप महिला अध्यक्ष संपूर्णा थळी, उरण शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील, मकरंद पोतदार, मनोज ठाकूर, श्रीपाद काटराणे, अजित भिंडे, मनन पटेल, नगरसेवक राजेश ठाकूर, नगरसेविका जन्व्ही पंडित, पुरुशोत्तम सेवक, मनोहर साहतिया, राजेश शाह, राजेश कोळी, नयन डांगी, मनोहर सहतीया, मनीष पाटील, दिनेश ठक्कर, नरेंद्र ठक्कर, हरेश भिंडे, मुकेश पुरी, हस्तीमल मेहता, राजेश शाह, अभिषेख जैन, विशाल पाटेकर, संतोष ओटावकर, निलेश कदम, दर्शन घरत, निर्मला भानुशाली, राजेश ठाकूर, निखील माळी, सचिन वैद्य, महेश म्हात्रे, काटधरे, सचिन पठारे, चंद्रकांत गायकवाड, गोपाल सैनी, स्वप्नील राहाटे, कैलास शिसोदिया, चंद्रकांत ठक्कर, दीपक दळी, कुणाल शिसोदिया, मनोज म्हात्रे, नंदन पानसरे, निलेश रावत, हेमंत भोईर, मंगेश म्हात्रे, महेश माळी, विनोद दाणी, सुरज ठवले, दीपक खैरे, अलका साठे, स्वप्नील राऊळे, चेतन पाटील, आकाश शाह, मोहनीश ओटावकर, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल परिवार, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ परिवार आदी सहभागी झाले होते.



# राष्ट्रीय शालेय तायक्वांदो स्पर्धेसाठी रायगडच्या कार्तिका आणि राधिकाची निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया व तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमानाने ३१ डिसेंबर ते ५ जानेवारी २०२४ रोजी बेतुल मध्यप्रदेश, पोलीस ग्राऊंड मध्यप्रदेश या ठिकाणी होणाऱ्या राष्ट्रीय शालेय तायक्वांदो स्पर्धेसाठी डॉ. पिल्लाई ग्लोबल अकॅडमी खांदा कॉलनी या शालेतील राधिका गिरीश नारायनन (इयत्ता ९ वी) व कार्तिका गिरीश नारायनन (इयत्ता १२ वी) या दोघींची महाराष्ट्र शालेय तायक्वांदो संघात निवड झाली आहे.



राधिका व कार्तिका या पनवेल मधील व्ही. के. हायस्कूल येथे आंतरराष्ट्रीय पंच व प्रशिक्षक सुभाष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तायक्वांदो खेळाचे प्रशिक्षण घेत आहेत. त्यांच्या या विजयाचे श्रेय जाते त्यांना मार्गदर्शन व सहकार्य करणारे तायक्वांदो मुख्य प्रशिक्षक सुभाष पाटील व सहाय्यक प्रशिक्षीका प्राजक्ता अंकोलेकर त्यांचे वडिल डॉ. गिरीश नारायनन यांना तसेच डॉ. पिल्लाई ग्लोबल ॲकॅडमी शालेचे प्राचार्य प्रकाश नायर व आमदार प्रशांत ठाकूर यांनी या यशाबद्दल राधिका व कार्तिकाचे विशेष अभिनंदन केले.

राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून व शाळेतील इतर कर्मचारी यांच्याकडून राधिका व कार्तिकावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# प्रशासकीय भवनाचे लवकरच लोकार्पण

**पनवेल : वार्ताहर**


मागील अनेक वर्षांपासून वाढीव कामासाठीची वित्त परवानगी तसेच न्यायालयीन वादामुळे रखडलेल्या शहरातील विविध सरकारी कार्यालयांसाठी बांधले जात असलेल्या प्रशासकीय भवनाच्या इमारतीचे बांधकाम ९० टक्के पूर्ण झाले आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्न व पाठपुराव्यामुळे मार्चमध्ये या भवनाचे लोकार्पण केले जाणार आहे.

सध्या या इमारतीमधील विद्युतीकरण आणि सुतारकाम अंतिम टप्प्यात सुरू असल्याची माहिती पनवेलच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने दिली. त्यामुळे मार्च महिन्यापासून तालुक्यातील सर्वसामान्यांना एकाच छताखाली सरकारी विविध विभागांच्या प्रशासकीय भवनातून सेवा मिळणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मार्फत पनवेलच्या प्रशासकीय भवन बांधण्याचे काम सुरू आहे. आतापर्यंत साडेदहा कोटी रुपये खर्च झाला असून अजूनही आठ कोटी रुपयांपर्यंतचा खर्च होणे अपेक्षित आहे. सुमारे १८ कोटी रुपये खर्च करून बांधत असलेल्या या इमारतीमध्ये विविध सरकारी विभागांचे कामकाज चालणार आहे.

अनेक वर्षांत फडके नाट्यगृहासमोरील तसेच कर्मवीर भाऊराव पाटील चौकासमोरील वर्दळ पुन्हा नवीन वर्षातील मार्च महिन्यापासून या परिसरात दिसणार आहे.

# मुरुडमध्ये कलश पूजन यात्रेत शेकडोच्या संख्येने रामभक्त सहभागी





(छाया : सुधीर नाझरे)

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील समस्त हिंदू समाजातर्फे आज मुरुड शहरात कलश पूजन यात्रेस शेकडोच्या संख्येने लोक सहभागी झाले होते. २२ जानेवारी रोजी श्रीराम मंदिराची प्राणप्रतिष्ठा असणार असून या पार्श्वभूमीवर अक्षता वाटप करण्यासाठी सदरची कलश पूजन यात्रा काढण्यात आली.

या वेळी या यात्रेस असंख्य मुरूडकर नागरिक सहभागी होऊन जय श्रीरामच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता. ताराराणी बँड पथकाच्या तालावर यात्रा मुरूड शहरातील संपूर्ण भागात फिरवण्यात येऊन श्रीराम मंदिराबाबत जनजागृती करण्यात आली. लवकरच प्रत्येक पाखाडी मधून अक्षता वाटप कार्यक्रमातून जनसंपर्क साधला जाणार आहे. येथून श्रीराम मंदिर जनजगृती व विविध धार्मिक कार्य राबवण्याबाबत लोकांना सांगण्यात येणार आहे.

या यात्रेस चोख पोलीस बंदोबस्त देण्यात आला होता. अनुप सिंग, दिलीप जोशी, संजय ठाकूर, कारसेवक भाई मिठागरी, समीर उपाध्ये व समस्त हिंदू समाज यांनी या यात्रेचे सुयोग्य नियोजन केले होते.

# 'थर्टीफर्स्ट'निमित्त दे धक्का मित्र मंडळाचा सामाजिक संदेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील सुकापूर येथील दे धक्का मित्र मंडळाने एक आगळावेगळा थर्टी फर्स्ट साजरा करून आजच्या तरुणाई समोर एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे.

एकीकडे तरुणाई थर्टी फर्स्टच्या बहाण्याने एन्जॉय करत असताना सुकापूर येथील दे धक्का मित्र मंडळामधील युवकांनी समाज प्रबोधन करण्यासाठी एक वेगळी थीम येथील मैदानात तयार केली आहे. यामध्ये ३१ डिसेंबरला मद्यपान न करून साजरी करावी, तसेच व्यसनामुळे काय काय परिणाम होतात, व्यसन कसे वाईट, मद्यपान केल्याने अपघात कसे घडतात या विषयावरसुद्धा अतिशय बोलकी अशी थीम या युवकांनी तयार केली आहे तसेच शेतकऱ्यांसाठी असा संदेश देणारी एक थीम तयार केली आहे खरोखरच अश्या युवकांचा आदर्श इतर समाजातील युवकांनी घेणे गरजेचे आहे.

चंद्रकांत केणी व रोशन केणी यांनी साकारलेल्या देखाव्याला भाजप अनुसूचित जाती मोर्चा उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अमित जाधव, भाजप सुकापूर अध्यक्ष राजेश पाटील, पालीदेवद अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष महेश पाटील, पालीदेवद सरचिटणीस उदय म्हस्कर, सुकापूर युवा मोर्चा अध्यक्ष महेश केणी आदींनी भेट दिली.



# विलास समेळ यांना पुरस्कार



**नवी मुंबई :** घणसोली येथील हस्ताक्षर आणि सुलेखनकार विलास समेळ यांना कुलाबा जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे.

सावित्रीबाई फुले यांच्या १९३ व्या जयंतीनिमित्त भाई जगताप मित्रमंडळ रायगड, काँग्रेस सेवा फाऊंडेशन रायगड, मधुशेठ ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट रायगड आणि रायगड शिवकलाम मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. ३) एका भव्य कार्यक्रमात हा पुरस्कार दिला जाणार आहे. गेली अकरा वर्षे समेळ हे नवी मुंबईत आपल्या अक्षर, सुलेखनसाठी प्रसिद्ध आहेत. अनेक पारितोषिके, पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत.

# जय गोपीनाथ प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

जय गोपीनाथ प्रतिष्ठानचे मार्गदर्शक बबन बारगजे व संस्थापक अध्यक्ष सुभाष आंधळे यांच्या मान्यतेने जय गोपीनाथ प्रतिष्ठानच्या उरण तालुका उपाध्यक्षपदी अश्विनी मुंडे तसेच विठ्ठल गुट्टे साहेब यांची कार्यालय प्रमुखपदी निवड करण्यात आली. दोघांनाही पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

जय गोपीनाथ प्रतिष्ठानचे कार्य करण्यासाठी अनेक लोक पुढे येत आहेत त्यांना प्रोत्साहन देऊन त्यांच्यावर जबाबदारी दिली जात आहे याचाच एक भाग म्हणून नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. या वेळी जय गोपीनाथ प्रतिष्ठान संस्थापक शुभाष आंधळे, रायगड जिल्हा अध्यक्ष किरण गिते, सहखजिनदार पप्पु सोनवणे, सहसचिव विठ्ठल घोळवे, सचिव हनुमंत विघ्ने, खजिनदार संग्राम केंद्रे, उपाध्यक्ष आनंद ठोंबरे, कार्याध्यक्ष भगवान जायभाय, महिला प्रदेश उपाध्यक्षा मनिषा वनवे, उरण तालुका अध्यक्ष अर्जुन डोंगरे, सदस्य सुदर्शन बुधवंत आदी उपस्थित होते.

पुढील काळात अनेकांना जबाबदाऱ्या देऊन संस्थेचे कार्य वाढविण्यासाठी मार्गदर्शन करणार आहोत, असे सुभाष आंधळे यांनी सांगितले.



# सरत्या वर्षाला जल्लोषात निरोप






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी पनवेलकर सज्ज झाले होते. नवीन वर्षाचे स्वागत सर्वत्र दणक्यात झाले असून खवय्यांना विविध पदार्थांचे मेजवानी चाखायला मिळाली. यासाठीचे नियोजन दोन दिवस आधीपासूनच सुरू झाले होते. एखाद्या उत्सवाप्रमाणे नवीन वर्षाच्या स्वागताचा जल्लोष झाला.

नववर्ष स्वागताचा उत्साह लक्षात घेता शहरातील हॉटेल चालकांकडून चोख नियोजन केले होते. अनेक ठिकाणी पार्ट्यांचे नियोजन करण्यात आले असून संगीत, लज्जतदार पदार्थ तसेच विविध शीतपेये चाखण्याची संधी मिळाली. तर हॉटेलमध्ये विशेष मेन्यू तयार करण्यात आला होते. यामध्ये चमचमीत, तिखट खाद्यपदार्थ यांच्यासह गोडधोड पदार्थांची मेजवाणी खवय्यांसाठी होती. नेहमीप्रमाणे यंदाही हॉटेल्स, रिसॉर्ट, फार्महाऊसमध्ये पार्ट्यांसाठी पहाटे पाचपर्यंत परवानगी देण्यात आलेली. तर, मद्यविक्री करणाऱ्या वाइन शॉपींना मध्यरात्री एकपर्यंत परवानगी दिली होती. त्यामुळे बेकायदा मद्य तस्करीचे प्रकार रोखण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून ठिकठिकाणी नाकाबंदी करण्यात आली. तसेच मद्यपींकडे परवाना नसेल तर अशा तळीरामांवर गुन्हे दाखल करण्यात आले.

**नवीन वर्षांत नवीन संकल्प**

दरवषीप्रमाणे यंदाही पनवेल परिसरात 'चला, व्यसनांना बदनाम करूया', 'द दारूचा नाही, द दुधाचा'मोहीम राबविण्यात आली. सायंकाळी ठिकठिकाणच्या पोलीस निवारा चौकात दूध वाटप करण्यात आले.

**घाटमाथ्यावरील बोकडाच्या मटणाला पसंती**

**नववर्षाचे स्वागत करताना रविवार असल्याने खवय्यांनी मांसाहाराचे बेत आखले होते. चिकनाबरोबरच मटणाच्या दुकानासमोर चांगलीच रांग दिसली. गावठी घाटावरील आणि ताजे बोकडाचे मटण मिळण्याची ख्याती असलेल्या पनवेल परिसरातील काही दुकानांत फलटण, सांगोला, आटपाडी, दहिवडी, लोणंद या ठिकाणाहून बोकड विक्रीसाठी आणले होते. तसेच दर्जेदार मटण मिळत असल्याने या दिवशी मटणाचे दर हे ६०० रुपयांच्या पुढे होते.**

**नवीन वर्ष स्वागताच्या जल्लोषात तरुणाई स्टंटबाजी करते. दारू पिऊन अरेरावीचे प्रकार होतात. कोणतीही घटना घडू नये, यासाठी नागरिकांसाठी टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला होता.**
**–पंकज डहाणे**, पोलीस उपायुक्त, पनवेल झोन–२

## 'मन की बात'चे प्रक्षेपण आणि आरोग्य तपासणी शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि. ३१) मन की बात कार्यक्रमाच्या माध्यमातून नागरिकांशी संवाद साधला. मन की बात कार्यक्रमाच्या १०८व्या भागाचे प्रक्षेपण भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात आयोजित करण्यात आले होते. यासोबतच मोफत आरोग्य तपासणी शिबिरही आयोजित करण्यात आले होते.

तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी यांच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमाला जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, जिल्हा संयोजक प्रल्हाद केणी, माजी नगरसेविका रूचिता लोंढे, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, संजय भगत, वंदे मातरम रिक्षा चालक संघटनेचे अध्यक्ष रवींद्र नाईक यांच्यासह इतर मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, मन की बात कार्यक्रमाचे औचित्य साधून रिक्षा चालक–मालक यांच्यासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.





**खारघर :** नववर्ष स्वागत समितीच्या माध्यमातून अक्षता कलश यात्रेचे आयोजन रविवारी सेक्टर १३ व १४मध्ये करण्यात आले होते. या धार्मिक कार्यक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कलश यात्रेत भाजपचे शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, युवा मोर्चा जिल्हा सचिव शुभ सोमनाथ पाटील, भूषण पाटील, महिला मोर्चा अध्यक्ष साधना पवार, शैलेंद्र त्रिपाठी आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, भाविक सहभागी झाले होते.



**पनवेल :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मन की बात कार्यक्रमाच्या माध्यमातून देशातील नागरिकांशी संवाद साधला. या कार्यक्रमाच्या १०८व्या भागाचे प्रक्षेपण भाजप नेते अजय भगत यांच्या शेलघर येथील निवासस्थानी आयोजित करण्यात आले होते. या वेळी भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, अमृत भगत, मनोहर भगत, रतन भगत, अजय भगत, सुहास भगत, महेंद्र भगत, संतोष भगत, चंद्रकांत भगत, समीर भगत, अनुप भगत, आदिश भगत, रहीम शेख आदी उपस्थित होते.

## शशिकला पाटील यांच्याकडून जासई विद्यालयात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य



**उरण, नवी मुंबई : बातमीदार**

शरद पवार इन्स्पायर फेलोशीप इन एज्युकेशन २०२३–२४ यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई, या प्रतिष्ठानकडून मिळालेली फेलोशिप शशिकला पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी वापरली आहे.

जासई येथील श्री. छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा.पाटील ज्युनियर कॉलेजच्या उपशिक्षिका शशिकला चंद्रकांत पाटील यांना इयता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत बसलेल्या विद्यार्थांना स्वयं: अध्ययन करण्याची सवय वाढविण्याच्या उपक्रमांतर्गत मिळालेल्या फेलोशिपमधून विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप अध्यापनात चांगले मार्गदर्शन मिळण्यासाठी जासई हायस्कूल मधील इयत्ता आठवी स्कॉलरशिप सन २०२३ – २४ या वर्षीच्या विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या मार्गदर्शिका 'क्लृप्त्या आणि सूत्रे' पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शिका – पंढरीनाथ राणे, या पुस्तकांचे वाटप करण्यात आले.

विद्यालयाचे प्राचार्य आणि रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग, रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नुरा शेख, गुरुकुल प्रमुख संतोष ठाकरे व फेलोशिप फेलो शशिकला पाटील, भोईर आर.पी यांच्या उपस्थितीत वाटप करण्यात आले. आणि विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच स्कॉलरशिप परीक्षेतील प्रश्नपत्रिकांचादेखील सराव होण्यासाठी लागणारे प्रश्नपत्रिका संच यांचे वाटपदेखील फेलोशिपमधून करण्यात आले.

## कामोठ्यात विनामूल्य योग प्रशिक्षण

**पनवेल : वार्ताहर**

नवीन वर्षात जीवन विद्या मिशन आणि श्री अंबिका योगाश्रम तर्फे विनामूल्य योग प्रशिक्षण वर्ग जीवन विद्या मिशन, से– ६, कामोठे येथे रविवार ७ जानेवारीपासून सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत होणार आहेत

योग हा भारतीय संस्कृतीचा भाग आहे, जो एखाद्या व्यक्तीच्या मानसिक आणि सामाजिक अस्तित्वाला चालना देण्यासोबत शरीर आणि मन संतुलित आणि शांत करण्यासाठी केला जातो. सध्या धावपळीच्या जीवनशैलीत आरोग्य निरोगी राहावे यासाठी नवीन वर्षात जीवन विद्या मिशन आणि श्री अंबिका योगाश्रम तर्फे विनामूल्य योग प्रशिक्षण वर्ग जीवन विद्या मिशन, सेक्टर ६, कामोठे येथे रविवार ७ जानेवारीपासून सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत होणार आहेत तरी यात नागरिकांनी सहभाग नोंदवावा अधिक माहितीसाठी ९३२४१८७६५१, ९८३३८५१३२४ येथे संपर्क करावा, असे आवाहन संतोष गाडे यांनी केले आहे.

## आपत्ती व्यवस्थापन कॅम्पमध्ये रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचा सहभाग

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने गडचिरोली येथील आव्हान आपत्ती व्यवस्थापन कॅम्प २०२३–२४ मध्ये सहभाग घेतला आहे.

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील अकाउंट व फायनान्स विभागातील तृतीय वर्षाचा ओमकार शेडगे या राष्ट्रीय स्वयंसेवकाची निवड या कॅम्पसाठी झाली असून पुढील दोन आठवडे तो कॅम्पमध्ये एन डी आर एफच्या मदतीने आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घेनार आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी त्याची निवड झाल्याबद्दल त्याचे अभिनंदन केले व पुढील प्रशिक्षणासाठी त्याला शुभेच्छा दिल्या. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक प्रा. प्रथमेश ठाकूर तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. राहुल कांबळे, प्रा. प्रतीक्षा पाटील, प्रा. राजश्री म्हात्रे, प्रा. करिष्मा कडव या सर्वांचे त्याला मोलाचे मार्गदर्शन लाभले व सर्वांनी त्याला पुढील प्रशिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, संस्थेचे व्हाईस चेअरमन श्री वाय टी देशमुख, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे या सर्वांनी त्याचे अभिनंदन केले व पुढील प्रशिक्षण प्रशिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.



वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा रामप्रहर










## काळसेकर टेक्निकल कॅम्पसमध्ये माजी विद्यार्थ्यांचा मेळावा



**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेलमधील अंजुमन–इ–इस्लाम काळसेकर टेक्निकल कॅम्पस स्कूल ऑफ फार्मसीने एका भव्य माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याचे आयोजन केले होते, ज्याने संस्थापक बॅचच्या प्रतिष्ठित पदवीधरांना एकत्र आणले होते.

कार्यक्रमाची सुरुवात माजी विद्यार्थी कनेक्ट सेंटरच्या समन्वयक प्रा. मारिया लाल यांच्या हार्दिक स्वागताने झाली आणि डॉ. शारीक सय्यद, डीन, यांनी माजी विद्यार्थ्यांशी कायम संबंध ठेवल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आणि संचालक डॉ. रमजान खाटिक यांनी प्रेरणादायी भाषण केले. बीआयएनएमचे मानद कार्यकारी अध्यक्ष बुरहान हॅरिस यांनी माजी विद्यार्थ्यांच्या समाजावर होणार्या सखोल परिणामावर भाष्य केले.

या कार्यक्रमात माजी विद्यार्थ्यांनी कॉर्पोरेट आणि उद्योजकीय प्रयत्नांमध्ये मिळवलेल्या उत्कृष्टतेवर प्रकाश टाकला, त्यांच्या यशोगाथा शेअर केल्या आणि भूतकाळाची आठवण करून दिली. माजी विद्यार्थ्यांनी मौल्यवान अभिप्राय शेअर करून औपचारिक कार्यवाहीची सांगता झाली, त्यानंतर विद्यार्थी परिषदेने आभार मानले. राष्ट्रगीत आणि ग्रुप फोटोसह देशभक्तीपर मेळाव्याची सांगता झाली.

समारंभानंतर, माजी विद्यार्थी सध्याच्या विद्यार्थ्यांसोबत सहभागी झाले आणि विविध क्लब तयार करून योगदानाचे नियोजन केले. संस्था आणि तिच्या पदवीधरांमधील चिरस्थायी बंधाचे प्रतीक असलेल्या वैयक्तिक भेटवस्तू देऊन कार्यक्रम संपवला. या भव्य माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याने केवळ संस्थापक बॅचचा सामायिक प्रवास साजरा केला नाही तर सतत सहयोग आणि जोडणीचा पायाही घातला.

हा कार्यक्रम अंजुमन–ए– इस्लाम संस्थेचे अध्यक्ष डॉ. झहीर काझी, संस्थेचे जनरल सेक्रेटरी अकील हाफीज, अंजुमन–ए– इस्लाम, नवी मुंबई शिक्षण समूहाचे एकझ्युकेटिव चेअरमन बुरहान हारीस, काळसेकर टेक्निकल कॅम्पसचे संचालक डॉ. रमझान खाटीक यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केले होते.

## संपादकीय

# नवी स्वप्ने, नवी आशा!

२०२३ वर्षाला जल्लोषात निरोप देऊन सन २०२४मध्ये सर्वांनी पाऊल टाकले आहे. हे वर्ष खूप महत्त्वाचे आहे. नववर्षाच्या पहिल्याच महिन्यात अर्थात २२ जानेवारी रोजी अयोध्येत प्रभू श्रीरामांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली जाणार आहे. समस्त भारतवर्षासाठी ही आनंदाची आणि अभिमानाची घटना असणार आहे. याच वर्षात देशाचे आगामी भवितव्य ठरविणारी लोकसभा निवडणूक होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आपला देश महासत्ता होण्याच्या दृष्टीने वाटचाल करीत आहे. अशा वेळी सलग तिसरी टर्म पंतप्रधानपद भूषविण्याची संधी त्यांना मिळणे आवश्यक आहे.

**कालचक्र कधी थांबत नसते. ते अविरतपणे सुरूच असते. असे असले तरी हल्लीच्या गतिमान युगात दिवस, महिने, वर्षे भर भर पुढे सरकत आहेत. मागील वर्षदेखील हा हा म्हणता सरून नवे वर्ष सुरू झाले. नव्या वर्षाची दिनदर्शिका घरच्या भिंतीवर लटकू लागली असून यंदा कधी, काय करायचे यावर आतापासूनच विचारमंथन केले जाऊ लागले आहे, कारण इंग्रजी कालगणनेनुसार दैनंदिन जीवनाचे नियोजन केले जाते. नवे वर्ष म्हटले की नवे संकल्प ओघानेच आले. अनेक जण वर्षारंभी वेगवेगळे संकल्प करीत असतात. कुणी व्यायामाचा करतो, तर कुणी वाचनाचा, कुणी बचतीचा, तर कुणी व्यसनमुक्तीचा. अगदी वृक्षारोपण, समाजसेवा यांचेही संकल्प केले जातात. त्यासाठी स्वतंत्र वेळापत्रक आखले जाते. सुरुवातीला त्याचे काटेकोरपणे पालन केले जाते, मात्र नव्याची नवलाई नऊ दिवस या प्रमाणे केलेला संकल्प बऱ्याचदा अर्धवट राहतो. फार कमी लोक तो सिद्धीस नेतात. मानसशास्त्रानुसार कोणतीही गोष्ट सलग २१ दिवस करीत राहिल्यास त्याची आपल्याला सवय लागते. खरंतर आपापल्या आवडीनिवडीनुसार कोणताही निश्चय करा, पण तो पूर्ण करण्यासाठी त्याला ध्येय मानून प्रयत्न करायला हवा. मुख्य म्हणजे एकदम शेवटचे टोक गाठण्याचा विचार न करता त्या दिशेने एक एक पाऊल टाकल्यास हळूहळू ध्येयापर्यंत पोहचता येऊ शकते. भले बुरे ते घडून गेले असे म्हणत सर्वांनी सरत्या वर्षाला निरोप देऊन जीवनगाणे नव्याने सुरू केले आहे. आयुष्यात सुख-दु:ख अनुभवतच पुढे जावे लागते. अशावेळी आपुलकीचा आधार महत्त्वाचा ठरतो, कारण माणूस हा समाजशील प्राणी आहे. एकमेकांच्या सोबतीने मार्गक्रमण केल्यास प्रवास कसा सुकर व सुखकर होतो. नव्या युगात माणूस नेमके हेच तो विसरलाय आणि मी व माझे कुटुंब यात गुरफटलाय, स्वत:सह परिवाराचा विचार करणे यात काही गैर नाही, परंतु त्याचबरोबर इतरांसाठीसुद्धा काही करता आले तर त्याहून दुसरा मोठा आनंद नाही. म्हणूनच केवळ स्वत:पुरते मर्यादित न राहता समाजासाठी काही तरी योगदान दिले पाहिजे. त्याचवेळी आप्त, मित्रमंडळी यांनाही जपले पाहिजे. चालू वर्ष उमेदीचे, आशा-आकांक्षा पूर्ण करणारे अन् आरोग्यदायी असावे अशीच प्रत्येकाची मनीषा असेल. जर काही साध्य करायचे असेल तर त्यासाठी परिश्रम घेणे आवश्यक असते. झोकून देत काम करून यशाची अनुभूती घेण्याचा आनंद अवर्णनीय असतो. असेच एक स्वप्न राम मंदिराच्या रूपाने पूर्ण होत आहे. यासाठी अनेकांनी योगदान दिले. ती स्वप्नपूर्ती २२ जानेवारीला अयोध्येत होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अशक्य ते शक्य करून दाखविले आहे. देशाची अर्थव्यवस्था त्यांनी पाचव्या क्रमांकावर आणली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली देशाचे भवितव्य उज्ज्वल आहे. म्हणूनच पुन्हा एकदा त्यांना पंतप्रधानपदी संधी दिल्यास जनतेची स्वप्नं पूर्ण होण्यास वेळ लागणार नाही.**

# कर्जत-पनवेल रेल्वेमार्ग ठरणार कर्जतकरांना वरदान



कर्जत-पनवेल रेल्वेमार्ग मंजूर झाल्यानंतर हा मार्ग पूर्ण झाला. हा एकेरी मार्ग करण्यात आला. १६-१७ वर्षांपूर्वी कर्जत-पनवेल रेल्वेमार्गावर प्रवासी वाहतूक सुरू झाली. सुरुवातीला हा मार्ग मालवाहू म्हणून सुरू झाला. नंतर लांब पल्ल्याच्या गाड्या या मार्गावरून धावू लागल्या, मात्र या मार्गावर लोकल गाड्या धावू शकत नाही असे समजल्यानंतर कर्जतकर प्रवाशांचा हिरमोड झाला. आता कर्जत-पनवेलसाठी नवीन मार्गिका टाकण्याचे काम सुरू आहे. हे काम २०२५पर्यंत पूर्ण होऊन त्यावरून लोकल गाड्यांची प्रवासी वाहतूक सुरू होईल असे सांगण्यात आल्याने ते कर्जतकरांना वरदान ठरणार आहे.

१९९५-९६ साली बॅ.ए.आर. अंतुले केंद्रीय आरोग्यमंत्री व केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री सुरेश कलमाडी यांच्या हस्ते हा रेल्वेमार्ग उभारण्यासाठी भूमिपूजन करण्यात आले होते. त्या वेळी कर्जत-चौक रस्त्याच्या समांतर हा मार्ग काढला असता तर कधीच लोकल गाड्या या मार्गावरून धावल्या असत्या, मात्र या रस्त्यावर मुंबईकर धनिक शेतकऱ्यांचे फार्महाऊस असल्याने हा मार्ग रस्त्याच्या कडेने न काढता बाजूने काढला व या मार्गावर हलिवली गावाजवळ बोगदा करावा लागला. हा मार्ग २००८ साली पूर्ण झाला, पण बोगद्याचे काम सदोष झाल्याने त्यामध्ये दरड कोसळून जीवितहानीसुद्धा झाली होती. त्यामुळे प्रवासी वाहतूक करणे धोक्याचे ठरेल म्हणून केवळ मालगाडीची वाहतूक सुरू करण्यात आली होती.

आता मुंबई रेल्वे विकास महामंडळाने पनवेल-कर्जत नवीन उपनगरी मार्गाचे काम वेगाने सुरू केले आहे. या प्रकल्पांतर्गत मुंबई लोकलच्या पायाभूत सुविधेत महत्त्वाचा टप्पा ठरणाऱ्या सर्वाधिक लांबीच्या बोगद्याच्या उभारणीस सुरुवात झाली आहे. सध्या मध्य रेल्वेवरील वापरात असलेल्या पारसिक बोगद्याच्या तुलनेत हा बोगदा दुपटीने लांब आहे. या मार्गावर कर्जत-वावर्ले दरम्यान होत असलेला बोगदा या मार्गावरील सर्वांत मोठा बोगदा असल्याचे मुंबई रेल्वे विकास मंडळाकडून सांगण्यात येत आहे. मुंबईहून पनवेलमार्गे कर्जतला जाण्याचा पर्याय या नव्या रेल्वेमार्गामुळे उपलब्ध होणार आहे. त्याआधी २००५मध्ये पनवेल-कर्जत या मार्गावर एकेरी मार्गिका टाकण्यात आली होती. त्या मार्गिकेतील वावर्ले ते हालिवली या बोगद्यात तांत्रिक अडचणींमुळे उपनगरीय लोकल गाड्या चालविली जात नाहीत. त्यात त्या वेळी बनविण्यात आलेला मार्ग हा एकेरी असल्याने वाहतुकीस फायद्याचा नव्हता. त्यामुळे मुंबई रेल्वे महामंडळ यांच्याकडून पनवेल-कर्जतदरम्यान नवीन दुहेरी मार्गिका टाकण्याचे काम सुरू आहे. या नवीन मार्गामुळे कल्याणमार्गे कर्जतला जाण्याच्या तुलनेत या मार्गावरून वेळेची बचत होणार आहे. या मार्गामुळे पनवेल-कर्जत या नव्या शहरांचा वेगवान विकास होईल, असे एमआरव्हीसीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक सुभाषचंद गुप्ता यांनी सांगितले होते. या मार्गिकेचे काम येत्या दोन वर्षांत होणार असल्याने या परिसरातील निवासी घरांचे व जमिनीचे दर वाढू लागले आहेत.



या रेल्वे मार्गावर नढाळ, किरवली आणि वावर्ले असे तीन बोगदे उभारण्यात येणार आहेत. यापैकी वावर्ले हा बोगदा २६०० मीटर लांबीचा आहे. नढाळची लांबी २१९ मीटर आणि किरवलीची लांबी ३०० मीटर आहे. वावर्ले बोगदा पूर्ण झाल्यावर हा मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गावरील सर्वाधिक लांबीचा बोगदा ठरणार आहे, असे एमआरव्हीसीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. या बोगद्याव्यतिरिक्त या मार्गावर दोन उड्डाणपूल उभारण्यात येणार असून कर्जतजवळील उड्डाणपूल १,२२५ मीटर आणि पनवेललगतचा पूल १,३७५ मीटरचा आहे. मार्च २०२५ पर्यंत प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. हा मार्ग सुरू झाल्यावर या मार्गावर असलेल्या गावांचा झपाट्याने विकास होईल आणि हा मार्ग कर्जतबरोबरच इतर शहरांचा विकास होण्यासाठी निश्चितच वरदान ठरेल.

आता कल्याणमार्गे मुंबईला जाताना वळसा घेऊन जावे लागते. या मार्गाने कर्जतकरांना खऱ्या अर्थाने मुंबई जवळ येईल आणि १७-१८ वर्षांचे लोकल गाड्या सुरू होण्याचे स्वप्न पूर्ण होईल.

### पनवेल-कर्जत उपनगरी रेल्वेमार्ग

- **खर्च - २,७८२ कोटी रुपये**
- **स्थानके - ५ (पनवेल, चिखले, मोहपे, चौक, कर्जत )**
- **रेल्वे मार्गिकांची एकूण लांबी - ३० किमी**
- **उड्डाणपूल - २**
- **बोगदे - ३**



## बदलते तंत्रज्ञान

# भारताचा स्वत:चा जीपीटी प्लॅटफॉर्म येणार




भारताचा स्वत:चा स्वदेशी जीपीटी प्लॅटफॉर्म निर्माण करण्यासाठी भारत सरकारने पुढाकार घेतला असून, यासाठी रिलायन्स जिओने मदतीचा हात पुढे केला आहे. रिलायन्स जिओ यासाठी मुंबई आयआयटीला सहकार्य करणार आहे. रिलायन्स जिओचे अध्यक्ष आकाश अंबानी यांनी या भागीदारीची घोषणा केली. मुंबई आयआयटीतील प्रा. गणेश रामकृष्णन हे भारतीयांसाठी जीपीटी आणि 'लार्ज लँग्वेज मॉडेल सोल्युशन्स' विकसित करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

आयआयटी मुंबईत विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या टेकफेस्ट या महोत्सवाला बुधवारी सुरुवात झाली. त्यामध्ये श्रद्धा शर्मा यांच्याशी झालेल्या संभाषणात अंबानी यांनी त्यांच्या महाविद्यालयीन दिवसांबद्दल तसेच आपल्या एकूण व्यवसायाबद्दल माहिती दिली.

टेलिकॉम आणि रिटेलसारख्या प्रमुख व्यवसायाच्या उभारणीसाठी वर्षभरापूर्वी भारतकेंद्रित बहुविध आणि बहुभाषिक मॉडेल वितरित करण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेला भारत जीपीटी कन्सोर्टियम वॉश हा आयआयटी मुंबईच्या नेतृत्वाखाली सार्वजनिक खासगी भागीदारी उपक्रम असून, यामध्ये आयआयटी मद्रास, आयआयटी मंडी, आयआयटी हैदराबाद, आयआयटी कानपूर, आणि आयआयएम इंदूरसारख्या प्रमुख तंत्रज्ञानविषयक शैक्षणिक संस्थांचा समावेश आहे.

आम्ही २०१४ मध्ये फोर-जी ही सेवा लाँच केली होती. तेव्हापासून टेकफेस्टशी आमचा संबंध आहे. इतकेच नाही, तर तंत्रज्ञानाच्या संदर्भात आयआयटीबरोबर विविध स्तरांवरही सहयोग आणि संबंध सुरू आहेत. आता नवीन तंत्रज्ञानाच्या युगात आम्ही आयआयटी मुंबईबरोबर कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) प्रकल्प आणि भारत जीपीटीसाठी भागीदारी करत आहेत, असे आकाश अंबानी यांनी सांगितले.

# भारतीय शास्त्रज्ञ सत्येंद्रनाथ बोस

भारतीय शास्त्रज्ञ सत्येंद्रनाथ बोस हे सैद्धांतिक भौतिकशास्त्रात तज्ज्ञ असलेले भारतीय गणितज्ञ आणि भौतिकशास्त्रज्ञ होते. बोस सांख्यिकी आणि बोस कंडेन्सेटच्या सिद्धांताचा पाया विकसित करण्यासाठी १९२० च्या सुरुवातीच्या काळात क्वांटम मेकॅनिक्सवर केलेल्या कामासाठी ते प्रसिद्ध आहेत. रॉयल सोसायटीचे फेलो, त्यांना भारत सरकारकडून १९५४मध्ये भारताचा दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार, पद्मविभूषण, प्रदान करण्यात आला. आज त्यांच्या जन्मदिवशी कार्याचा घेतलेला धांडोळा...



### निमित्त

बोस-आइन्स्टाईन जोडीतील विश्वविख्यात शास्त्रज्ञ सत्येंद्रनाथ यांचा जन्म १ जानेवारी १८९४ रोजी कोलकाता येथे झाला. त्यांचे वडील सुरेंद्रनाथ हे रेल्वेत नोकरीला होते. बोस यांचा जन्म कलकत्ता येथे झाला. ते बंगाली कायस्थ कुटुंबातील सात मुलांपैकी सर्वात मोठे होते. त्यांचे शालेय शिक्षण वयाच्या पाचव्या वर्षी त्यांच्या घराजवळ सुरू झाले. जेव्हा त्यांचे कुटुंब गोबागन येथे गेले तेव्हा त्यांना न्यू इंडियन स्कूलमध्ये दाखल करण्यात आले. शाळेच्या शेवटच्या वर्षात त्याला हिंदू शाळेत प्रवेश मिळाला. १९०९मध्ये त्यांनी प्रवेश परीक्षा (मॅट्रिक) उत्तीर्ण केली. पुढे ते प्रेसिडेन्सी कॉलेज, कलकत्ता येथे इंटरमिजिएट सायन्स कोर्समध्ये सामील झाले, जिथे त्यांच्या शिक्षकांमध्ये जगदीश चंद्र बोस, शारदा प्रसन्न दास आणि प्रफुल्ल चंद्र रे यांचा समावेश होता.

बोस यांना प्रेसिडेन्सी कॉलेजमधून मिश्र गणित विषयात विज्ञान पदवी प्राप्त झाली. १९१३मध्ये ते प्रथम आले. त्यानंतर त्यांनी आशुतोष मुखर्जी यांच्या नव्याने स्थापन झालेल्या विज्ञान महाविद्यालयात प्रवेश घेतला. जिथे ते पुन्हा १९१५मध्ये एमएससी मिश्रित गणिताच्या परीक्षेत प्रथम आले. एमएस्सी परीक्षेत त्यांचे गुण निर्माण झाले. कलकत्ता विद्यापीठाच्या इतिहासात नवा विक्रम, जो अजून पार करायचा आहे. एमएससी पूर्ण केल्यानंतर बोस १९१६मध्ये कोलकाता विद्यापीठाच्या सायन्स कॉलेजमध्ये रिसर्च स्कॉलर म्हणून रुजू झाले आणि त्यांनी सापेक्षतेच्या सिद्धांतावर अभ्यास सुरू केला. क्वांटम सिद्धांत नुकताच क्षितिजावर दिसला होता आणि महत्त्वाचे परिणाम दिसायला लागले होते. बोस यांना बंगाली, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन आणि संस्कृत तसेच लॉर्ड टेनिसन, रवींद्रनाथ टागोर आणि कालिदास यांच्या कविता यांसारख्या अनेक भाषांमध्ये पारंगत होते. ते व्हायोलिनसारखे भारतीय वाद्य एसराज वाजवू शकत होते. वर्किंग मेन्स इन्स्टिट्यूट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रात्रीच्या शाळा चालवण्यात त्यांचा सक्रिय सहभाग होता.

बोस यांनी साहा यांच्यासमवेत १९१८पासून सैद्धांतिक भौतिकशास्त्र आणि शुद्ध गणितामध्ये अनेक पेपर्स सादर केले. १९२४मध्ये ढाका विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात वाचक म्हणून काम करत असताना, बोस यांनी शास्त्रीय भौतिकशास्त्राचा कोणताही संदर्भ न घेता प्लँकच्या क्वांटम रेडिएशन कायद्याची व्युत्पन्न करणारा एक शोधनिबंध लिहिला. क्वांटम स्टॅटिस्टिक्सचे महत्त्वाचे क्षेत्र तयार करण्यात हा पेपर महत्त्वाचा होता. प्रकाशनासाठी लगेच स्वीकारले नसले तरी त्यांनी तो लेख थेट जर्मनीतील अल्बर्ट आइनस्टाईन यांना पाठवला. आइन्स्टाईनने पेपरचे महत्त्व ओळखून स्वतः जर्मन भाषेत भाषांतर केले आणि बोस यांच्या वतीने प्रतिष्ठित Zeitschrift fr Physik यांना सादर केले. या ओळखीचा परिणाम म्हणून, बोस युरोपियन क्ष-किरण आणि क्रिस्टलोग्राफी प्रयोगशाळांमध्ये दोन वर्षे काम करू शकले, ज्या दरम्यान त्यांनी लुईस डी ब्रोग्ली, मेरी क्युरी आणि आइन्स्टाईन यांच्यासोबत काम केले.

९५८ साली सत्येंद्रनाथांना भारत सरकारने पद्मविभूषण पुरस्कार देऊन गौरविले आणि त्यांना राष्ट्रीय प्रोफेसर म्हणण्यात येऊ लागले, त्याच वर्षी लंडन येथील रॉयल सोसयटीने त्यांना आपला सहकारी म्हणून जाहीर केले. ४ फेब्रुवारी १९७४ रोजी सत्येंद्रनाथांचे हृदय रोगामुळे निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

### क्लिक...क्लिक...!



**मावळ : प्रसिद्ध एकविरा देवीच्या कार्ला डोंगरावरून टिपलेले भोवतालच्या परिसराचे विहंगम दृश्य.**

## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यात आहारामध्ये 'या' फळांचा करा समावेश



हिवाळ्यामध्ये वातावरण अतिशय थंड असते. त्यामुळे आपण बरेचदा पांघरूणात गुरफटून पडून राहणे पसंत करतो, मात्र ही थंडी सर्दी-खोकल्यासारखे हलके आजार घेऊन येते. आपली हाडे आणि सांधे आखडण्याच्या समस्या उद्‌भवतात. अशावेळेस आहारात जर थंडीच्या दिवसांमध्ये येणाऱ्या फळांचा समावेश केला, तर त्यामधून मिळणारी जीवनसत्वे, फायबर, खनिजे यांसारखे घटक शरीरसाठी उपयुक्त ठरू शकतात.

संत्र या फळामध्ये क जीवनसत्व भरपूर प्रमाणात असतात. त्यामुळे शरीरातील अनावश्यक घटक बाहेर टाकण्यासाठी डिटॉक्स म्हणून याचा उत्तम वापर केला जाऊ शकतो. त्यामुळे संत्र वजन नियंत्रित ठेवण्याकरिता उपयुक्त ठरू शकते. संत्र्यामध्ये फायबर, पोटॅशियम, खनिज यांचे प्रमाण जास्त असून कॅलरीजचे प्रमाण कमी असते. म्हणून संत्री खाल्ल्याने पचनास मदत होऊन, पोट अधिक काळ भरल्यासारखे राहते.

डाळिंब या फळामध्ये फायबर, खनिज आणि अँटिऑक्सिडंट्स भरभरून असतात. त्यासोबतच या फळात कॅलरीज कमी असतात. या फळाचे सेवन व्यायामाआधी किंवा व्यायामानंतर करू शकता.

सफरचंदामध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे पचन चांगले होण्यासाठी, सोबतच पोट अधिक काळासाठी भरलेले राहण्यास मदत होते. ज्यांना वजन कमी करायचे असेल त्यांच्यासाठी रिकाम्या वेळेत किंवा अवेळी काही खावेसे वाटत असल्यास सफरचंद खाणे उपयुक्त ठरू शकते.

किवीमध्ये प्रचंड प्रमाणात पौष्टिक घटक असून यात क जीवनसत्वे, के जीवनसत्वे, फायबर असतात. कॅलरीजचे प्रमाण कमी असते. आतमधून हिरवे दिसणारे हे आंबटसर फळ एखाद्या सॅलेडची चव आणि पौष्टिकता वाढवण्याचे काम करत असते.

पेरू या फळाला प्रचंड गर असून त्यामध्ये प्रथिने आणि फायबरदेखील भरपूर असतात. वजन कमी करताना पेरू खाणे उपयुक्त ठरू शकते.

चवीला अतिशय गोड लागणारे सीताफळ केवळ चवीत सर्वोत्तम नसून त्यामध्ये पौष्टिक घटकांची रेलचेल असते. यामध्ये अ आणि क जीवनसत्त्वे, काही प्रमाणात लोह, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि कॉपर यांसारखे घटक आढळतात.




**श्रीवर्धन : सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी दिवेआगर समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांनी मोठी गर्दी केली होती. अनेक पर्यटक किनाऱ्यावरील विविध राईड्सचा मनमुराद आनंद लुटताना दिसून आले.** (छाया : अमेय नाझरे)

# झाडाच्या फांद्या तोडताना कोसळून एक जण दगावला

## पोलादपूर तालुक्यातील घटना

**पोलादपूर : प्रतिनिधी**

देवळे ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील लहुळसे गावाच्या जंगल भागातील झाड तोडण्यासाठी शनिवारी (दि. ३०) सकाळी गेलेला व्यक्ती दुपारी जेवायला घरी परत आला नसल्याने लोकांनी शोधाशोध केली असता तो एका झाडाच्या खाली गतप्राण अवस्थेत आढळून आला.



लहुळसे येथील नारायण रावजी माचुत्रे (वय ५६) हे शनिवारी सकाळी साडेनऊ वाजण्यापूर्वी घरातून जंगलभागातील झाड तोडण्यासाठी गेले असता दुपारी जेवायला घरी परत आले नाहीत. यामुळे त्यांच्या गावांतील लोकांनी शोध घेतला असता जंगलातील झाडाखाली फांदीवरून निसटून जमिनीवर डोक्यावर आपटून मार लागल्याने मृतावस्थेत ते आढळून आले.

याबाबत पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये त्यांचा मुलगा उत्तम नारायण माचुत्रे याने फिर्याद दिली असून पोलीस हवालदार पवार हे सहायक पोलीस निरिक्षक युवराज म्हसकर यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास करीत आहेत. मयत नारायण माचुत्रे यांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन पोलादपूर ग्रामीण रूग्णालयामध्ये करण्यात आले.

याप्रकरणी अकस्मात मृत्यू रजिस्टर नं. २५-२०२३ मध्ये सीआरपीसी १७४ नुसार नोंद करण्यात आली आहे.

पोलादपूर तालुक्यात कोवळू तोडणे म्हणजे नवीन पालवी फुटण्यासाठी झाडांच्या जुन्या फांद्या तोडून शेतामध्ये राब पेटविण्यासाठी रचण्याचा हा कालावधी असून अनेक शेतकरी या काळात जंगलातील झाडांच्या फांद्या तोडून शेतामध्ये आणून राब पसरवित असतात. यामुळे कधी जंगलातील झाडाच्या फांद्यां विजेच्या खांबाला चिकटून असल्यास शॉक बसून तर कधी अचानक तोल जाऊन मृत होण्याच्या घटना घडत असतात.

## वरदविनायकाच्या दर्शनासाठी भक्तांची रीघ

**खोपोली : प्रतिनिधी**

सरत्या वर्षाला निरोप देताना बाप्पाच्या दर्शनासाठी हजारोच्या संख्येने भाविक वरद विनायक नगरी महडमध्ये (खालापूर) रविवारी दाखल झाले होते. तालुक्यातील अष्टविनायक पैकी एक असलेले महड येथील गणपती मंदिरात शनिवारी संकष्टीनंतर रविवारीदेखील भाविकांची संख्या प्रचंड होती.

नवसाला पावणारा गणपती अशी ख्याती असलेला वरद विनायक गणपती दर्शनासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक आले होते. यामध्ये शालेय सहलीची देखील भर पडली होती. शनिवारी संकष्ट चतुर्थी, रविवार वर्षाचा अखेरचा दिवस आणि सोमवार नवीन वर्षातील पहिला दिवस यामुळे तीन दिवस मिळून भाविकांची संख्या लाखाच्या घरात जाणार आहे. स्थानिक व्यावसायिकांना तीन दिवस चांगला व्यवसाय होणार आहे.




# शिवरायांच्या पुतळ्यासाठी शासनाकडून निधी आणेन

- खासदार सुनील तटकरे यांचे मुरूडमध्ये आश्वासन
- पर्यटन महोत्सवात ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार

**मुरुड : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांनी पदमदुर्ग किल्ल्याची निर्मिती केली होती. जंजिरा किल्ला जिंकता यावा यासाठी हा खासकरून किल्ला बांधण्यात आला होता. मुरूडमधील बहुसंख्य नागरिकांची इच्छा आहे की, पदमदुर्ग किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसावा व येथे शिवसुर्ष्टी ची निर्मिती व्हावी सर्व नागरिकांच्या मागणीचा आदर करीत लवकरच मी दिल्ली येथे पुरातत्व खात्यांच्या अधिकारी वर्गाला भेटून या किल्ल्यावर पुतळा बसवण्यासाठीची परवानगी घेणार असून त्यासाठी राज्य शासनाकडून निधी सुद्धा उपलब्ध करून देईन, असे प्रतिपादन रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी मुरूड येथील पर्यटन महोत्सवावेळी केले आहे.



मुरूड पर्यटन महोत्सवात सहभागी होत असताना त्यांच्या हस्ते जेष्ठ नागरिकांचा सुद्धा सत्कार करण्यात आला.यावेळी व्यासपीठावर अलिबाग मुरुड विधासभा क्षेत्राचे आमदार महेंद्र दळवी,रायगड जिल्हा संपर्क प्रमुख प्रकाश देसाई, पर्यटन महोत्सव अध्यक्ष कल्पना पाटील, राष्ट्रवादी मुरूड तालुका अध्यक्ष फैरोज घलटे,माजी सभापती स्मिता खेडेकर, आगरदांडा सरपंच आशिष हेदुलकर, शिवसेनेचे जिल्हा उपाध्यक्ष भरत बेलोसे,चेरमन बाबा दांडेकर, शिवसेनेचे मुरूड शहर अध्यक्ष संदीप पाटील,सचिव विजय पैर, हसमुख जैन, पर्यटन महोत्सव उपाध्यक्ष प्रकाश सरपाटील, वीरेंद्र भगत, मुख्याधिकारी पंकज भुसे मृणाल खोत आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन करताना खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले की, नेतृत्व करणाऱ्यांकडे सुजनशीलता असेल तर त्या भागाचा निश्चित विकास होणार आहे.आमदार महेंद्र दळवी यांनी या मतदार संघात कोट्यवधी रुपयांचा निधी आणून विकास कामाना चालना दिली या कोणीही शंका व्यक्त करू शकत नाही.राष्ट्रवादी पक्ष आता महायुतीत समाविष्ठ झाला असून आगामी येणाऱ्या सर्व निवडणूक भाजप,राष्ट्रवादी व शिवसेना एकत्र लढणार असून विजय निश्चितच प्राप्त करणार आहे.

फेब्रुवारी महिन्यात राज्याचा अर्थ संकल्प जाहीर होणार असून मुरुडच्या विकासाची कामे मोठ्या पद्धतीने आमदार दळवी यांनी टाकावी अजितदादा पवार यांच्याकडून मंजूर करून घेण्याची माझी जबाबदारी असणारा आहे. लोकांनी काम व विकास करणाऱ्या पक्षाला पुन्हा संधी द्यावी अशी मागणी यावेळी तटकरे यांनी केली.

या वेळी आमदार महेंद्र दळवी यांनी सांगितले की, खासदार तटकरे यांचे काम दिशादर्शक असून होणाऱ्या आगामी निवडणूक आम्ही त्यांच्या मार्गदर्शनाखाली लढणार आहोत. येणाऱ्या आगामी काळात मुरूडच्या विकासासाठीची सर्व कामे पूर्ण करणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

शिवसेनेचे रायगड जिल्हा संपर्क प्रमुख प्रकाश देसाई यांनी मागणी केली संसदेत ठराव पारित करावा की, जेष्ठ सांसद याना बोलण्याची प्रथम संधी देण्यात यावी तद्नंतर जुनिअर बोलतील असा ठराव पारित करण्याची मागणी केली. सुनील तटकरे हे रायगडचे लोकप्रिय खासदार असून त्यांची काम करण्याची अदभूतपूर्व शैली असून जनता त्यांना खूप मानणारी आहे. यंदाच्या खासदारकीच्या निवडणुकीत ते दीड लाख मतांनी विजयी होतील यात कोणीही शंका करण्याचे कारण नाही.

कार्यक्रमात जेष्ठ नागरिकांचा सत्कार खासदार सुनील तटकरे यांच्या शुभ हस्ते करण्यात आला. तसेच मुरुड तालुका कबड्डी स्पर्धेत विजयी संघाना ट्रॉफी देऊन सुद्धा सन्मानित करण्यात आले.सदरील कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने जनसमुदाय लोटला होता.



## भाजप रोहा तालुका कार्यकारिणी जाहीर; नियुक्तीपत्र प्रदान

**धाटाव : प्रतिनिधी**

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कोकणचे नेते तथा राज्याचे मंत्री रवींद्र चव्हाण, पनवेल विधानसभेचे आमदार प्रशांत ठाकूर, पेण विधानसभेचे आमदार रविशेठ पाटील, रायगड लोकसभा निवडणूक प्रमुख सतीश धारप, दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांच्या सूचनेने तसेच रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपची रोहा तालुका कार्यकारिणी शासकीय विश्रामगृहात जाहीर करण्यात आली.

या वेळी सरचिटणीस एकनाथ ठाकूर, कृष्णा बामणे, आनंद लाड, उपाध्यक्ष रवींद्र तारू, विष्णू मोरे, शिवाजी जाधव, नितीन तेंडुलकर, वसंत शेडगे, तानाजी (आप्पा) देशमुख, कोषाध्यक्ष राजेश डाके, चिटणीस राजा किर्जत, दिनकर खरीवले, दिनकर सानप, अरुण वाघमारे, परशुराम वाघमारे, शैलेश रावकर, अनिल पवार, जगन्नाथ ठाकूर, सोशल मीडियापदी कल्पेश माने, आयटी सेल अध्यक्ष निखिल बोरोले, ट्रान्सपोर्ट सेल अध्यक्ष मिथुन सरलेकर यांना जबाबदारी देऊन सर्वांना नियुक्तीपत्र देण्यात आले.



## अलिबागमध्ये अक्षता कलश यात्रा उत्साहात






### जय श्रीरामचा नारा दुमदुमला

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबागमध्ये रविवारी (दि.३१) अक्षता कलश यात्रेचे सकल हिंदू समाज यांच्यातर्फे आयोजन करण्यात आले होते. याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अलिबाग शहरात जय श्रीरामचा नारा दुमदुमत होता.

प्रभू श्रीरामांचे भव्य दिव्य मंदिर अयोध्येत साकारत आहे. या मंदिरात २२ जानेवारी २०२४ रोजी श्रीराम मूर्तीची प्रतिष्ठापना होणार आहे. त्याचे निमंत्रण देण्यासाठी घरोघरी रामभक्त फिरणार आहेत. त्याकरिता अयोध्येतून आलेल्या अक्षतांच्या कलशाची अलिबागमध्ये मिरवणूक काढण्यात आली.

या यात्रेची सुरुवात अलिबाग शहारातील राममंदिर येथून झाले. ही यात्रा एस.टी. स्टँड, नगरपलिका, ठीकरुळ नाका मार्गे बाजरपेठत आली. बाजरपेठेत जैन समुदायाने यात्रेचे स्वागत केले. जोगळेकर नाकायेथील काशिविश्वेश्वर मंदिरासमोर ॲड. श्रीराम ठोसर यांनी संबोधित केले. त्यानतंर यात्रेची सांगता झाली.

आमदार महेंद्र दळवी, मानसी दळवी, भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर, भाजप अलिबाग शहर अध्यक्ष ॲड. अंकित बंगेरा, भाजप जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, भाजपचे युवा नेते निखील चव्हाण, राष्ट्रिय स्वयंसेवक संघाचे अप्पा करंबत, अण्णा सुतार, संतोष मोहिते, समीर ठाकूर, अशोक वारगे आदी या यात्रेत सहभागी झाले होते.

# नववर्षाच्या स्वागतासाठी पर्यटकांची माथेरानला पसंती

**माथेरान : प्रतिनिधी**

नाताळ आणि त्यापाठोपाठ नववर्षाच्या स्वागतासाठी पर्यटकांनी माथेरानला पसंती दिली असून एकदिवसीय पर्यटकांचा भरणा मोठ्या प्रमाणावर दिसत आहे.



सुट्ट्यांचा हंगाम असल्यामुळे अनेकांनी हॉटेल्स, लॉजचे आरक्षण केल्यामुळे त्यांना सोपस्कार झाले. मिनिट्रेन त्याचप्रमाणे सध्या सुरू असलेल्या ई रिक्षाच्या माध्यमातून पर्यटकांनी आपल्या बालगोपालांसह आनंद घेतला. कुणी आबालवृद्ध हातरीक्षा,तर हौशी पर्यटकांनी घोड्यावरून रपेट करत नयनरम्य पॉईंट्सच्या देखावे पाहण्यात मग्न दिसत होते. खरेदीसाठी सायंकाळी बाजारपेठमध्ये खरेदीसाठी गर्दी केली होती.

लहानमोठ्या स्टोल्स वर मका, आईस गोळा खाण्यासाठी खवय्यांची झुंबड दिसत होती तर पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी हॉटेल्समध्ये रंगीबेरंगी विद्युतरोषणाई केल्यामुळे सर्वत्र एक वेगळाच उत्साह आणि माथेरानला एकप्रकारे जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

**दरवर्षीप्रमाणे यावेळेस त्याप्रमाणात एवढी गर्दी दिसत नव्हती अन्यथा ऐनवेळी इथे रूम्स मिळणे मुश्किल होते. अगदी सहजपणे हॉटेलमध्ये खोल्या उपलब्ध झाल्या. आम्ही मुलांसोबत मिनिट्रेन मधून खुप एन्जॉय केला.**

**-ब्रिजमोहन निळकंठ, पर्यटक, मुंबई**

## आमदार थोरवेंकडून मोगरे कुटुंबीयांचे सांत्वन

**खोपोली : प्रतिनिधी**

विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा मंत्री रमेश मोगरे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या निधनाने विश्व हिंदू परिषद व संघ परिवाराचे मोठे नुकसान झाले. त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला, या पार्श्वभूमीवर कर्जत खालापूरचे आमदार महेंद्र थोरवे यांनी शनिवारी सायंकाळी मोगरे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली.



या वेळी आमदार थोरवे यांनी मोगरे यांच्या सामाजिक कार्याबद्दल गौरव उद्गार काढले, एक आमदार नव्हे तर भाऊ म्हणून तुमच्या पाठीशी मी उभा राहील असे उद्गार थोरवे यांनी काढले. आमचे कार्यकर्ते तुमच्या संपर्कात असतील आपण ही निसंकोच पणे सांगावे असे त्यांनी विनंती केली.

या वेळी शिवसेना शहरप्रमुख संदीप पाटील, माजी उपनगराध्यक्ष राजू गायकवाड, सहकार सेनेचे हरीश काळे, ईश्वर शिंपी, राहुल गायकवाड, संतोष माळकर इत्यादी सह शिवसेनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# नवी मुंबईतील रेल्वेस्थानकांवर भिकाऱ्यांचा ठिय्या

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई शहरातील वाशी, ऐरोली, रबाळे, घणसोली, तुर्भे, जुईनगर, सानपाडा, नेरूळ रेल्वे स्थानकात आणि परिसरात भिकारी फेरीवाले आणि बेघर यांनी आपले संसार थाटले आहेत. या उपद्रवी घटकांनी रेल्वेस्थानक व परिसरात ठाण मांडल्यामुळे येणारे जाणारे प्रवासी व रेल्वेस्थानकात गाळे असलेले दुकानमालकदेखील हैराण झाले आहेत.

## फेरीवाल्यांचाही वावर वाढला

नेरूळ रेल्वेस्थानकात रात्री १०नंतर फलाट आणि तिकीट खडकीजवळ भिकारी व बेघर आपले बस्तान मांडतात. काही जण दिवसभर आपले ठाण मांडून असतात. त्याच ठिकाणी जेवण करून अस्वच्छता करतात. फलाटावरसुद्धा अंथरूण टाकून झोपलेल्याचे दृश्य पाहावयास मिळते. आधुनिक काळात नोकरदार महिलांना रात्री उशिरा प्रवास करावा लागतो. रेल्वे डब्यांमध्ये महिलांना सुरक्षा पुरवली जाते, मात्र रेल्वे स्थानक परिसर आणि फलाटावर सुरक्षा रक्षक अपुरे असल्याने असुरक्षेची भावना त्यांच्यात आहे. स्थानकाच्या बाहेर रात्रीचा प्रवास करणाऱ्या महिलांना मद्यपी व गर्दुल्ले यांच्याकडून त्रास होत असतो. याबाबत अनेकदा वेळेअभावी प्रत्यक्ष तक्रार होत नसल्याने रेल्वे पोलीस कारवाई करण्याकडे दुर्लक्ष करतात, असे प्रवाशांकडून बोलले जात आहे. रेल्वेस्थानकाबाहेर बकालपणा आला असून वेगवेगळे गैरप्रकार घडत असून भांडण तंटे, शिवीगाळ असे अनेक प्रकार सरार्सपणे सुरू असल्याने कारवाईची मागणी होत आहे.

हार्बर व ट्रान्स हार्बर मार्गांना जोडणाऱ्या जुईनगर रेल्वेस्थानकात अनेक समस्यांमुळे प्रवासी हैराण झाले आहेत. पाणपोईत गुटख्याची पाकिटे साचून घाणीचे साम्राज्य पसरले आहे. फेरीवाल्यांकडून फलाटावर कचरा केला जात असून प्रवाशांना दुर्गंधीतच गाडीची प्रतीक्षा करावी लागते, तर स्थानकाबाहेर वारांगना व रिक्षाचालकांच्या मनमानीचा उपद्रव सहन करावा लागत आहे. स्थानकाच्या पश्चिमेकडे दिव्यांअभावी अंधाराचे साम्राज्य असल्यामुळे अनेक प्रेमीयुगुलांकडून चाळे केले जातात.





जुईनगर रेल्वेस्थानकातून डी मार्टच्या दिशेने बाहेर पडताना अंधाराचे साम्राज्य पसरलेले आहे. रेल्वेस्थानकाच्या बाहेर दिव्यांची सुविधा उपलब्ध नसल्याने रात्रीच्या वेळी स्टेशनच्या बाहेर अंधारमय वातावरण पाहायला मिळते तसेच रेल्वेस्थानकाच्या डी मार्टच्या दिशेने बाहेर येताना अंधार असल्याने पादचाऱ्यांना रात्रीच्या वेळी जीव मुठीत घेऊन बाहेर पडावे लागत आहे. सानपाडा पूर्व भागात फेरीवाले, भिकारी आणि उपद्रवी मूल्य घटकांचा वावर मोठ्या प्रमाणात आहे. ऐरोली, रबाळे या स्थानकांच्या पूर्व आणि पाश्चिम दिशेलादेखील मोठ्या प्रमाणात फेरीवाल्यांनी ठाण मांडले आहे. सिडको आणि पालिका आपली जबाबदारी एकमेकांवर ढकलत असतात. त्यामुळे या कारवाईमध्ये दिरंगाई होते.

> **रेल्वे पोलीस दल आणि सिडको सुरक्षा रक्षक अशा घटकाविरोधात वारंवार कारवाई करित असते. रेल्वेस्थानक परिसरात उपद्रव करणार्यांवर कारवाई करावी, असे सिडको प्रशासनास लेखी स्वरुपात कळविले आहे.**
>
> **–एस. एम. नायर,**
> **रेल्वे स्टेशन अधीक्षक, नेरूळ**

## कोपरखैरणे स्टेशन परिसर झाला भिकारीमुक्त!



**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरखैरणे रेल्वे स्थानक परिसर संपूर्ण परिसर या भिकाऱ्यांनी वेढलेला होता. या भिकाऱ्यांनी संपूर्ण परिसरात आपले समानदेखील विखुरलेले होते. त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना त्याचा त्रास होत होता. याबाबत स्वराज्य पक्षाने रेल्वे अधिकाऱ्यांना सिडको तसेच आरपीएफ, पोलीस यंत्रणेला पत्र देऊन रेल्वेस्थानक परिसर भिकारीमुक्त करावा, अशी मागणी केली होती. अखेर त्यास यश येऊन कोपरखैरणे रेल्वेस्थानक भिकारीमुक्त होऊन स्थानकाने मोकळा श्वास घेतला आहे.

कोपरखैरणे स्थानकाला या भिकाऱ्यानी वेढले होते. स्थानक जाण्याच्या मार्गावर हे भिकारी सामान सुमान घेऊन राहत होते. उघड्यावर शौच, लघुशंका केली जात होती. तसेच शिळे अन्न खाऊन उघड्यावर टाकून दीले जात होते. त्यामुळे परिसरात कचरा साठला होता. एकूणच या परिसराला बकालपणा आला होता. कोपरखैरणे स्थानकातील ही परिस्थिती स्वराज्य पक्षाने सिडको, रेल्वे पोलिसांच्या लक्षात आणून दिली होती. अखेर त्यास यश येऊन कोपरखैरणे रेल्वे परिसर भिकारीमुक्त झाला आहे. त्यामुळे नागरिकांनीदेखील समाधान व्यक्त केले आहे.



## ‘अंनिस’तर्फे चला व्यसनाला बदनाम करूया अभियान

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा रबाळेच्या वतीने ’चला व्यसनाला बदनाम करूया’ अभियान अंतर्गत नवी मुंबई महापालिका संचलित राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय आंबेडकर नगर रबाळे येथे शालेय परिपाठामध्येच मुलांना वाईट व्यसनापासून दूर रहा स्वतःचा व कुटुंबाचा उद्धार करा म्हणजे देशाचा उद्धार होईल, अशा संदेश रबाळे शाखा कार्याध्यक्ष अविनाश जाधव यांनी दिला.

दारू, गुटखा, मावा, सिगारेट, गांजा, चरस अशा अमली पदार्थांचे सेवन स्वतः करू नका व आपले मित्र, नातेवाईक, आप्तेष्ट यांना ही करू देऊ नका त्यांना या पासून परावृत्त करा अशी माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना अनेक उदाहरणातून दिली. काही विध्यार्थी यांनी शंका उपस्थित केल्या त्याचे ही निरसन जाधव यांनी केले.

सर्व विद्यार्थ्यांना व्यसन मुक्तीची शपथ नवी मुंबई जिल्हा सचिव प्रा. अमोलकुमार वाघमारे यांनी दिली कार्यक्रमास मुख्याध्यापक व रबाळे शाखा सचिव अमोल खरसंबळे, राजू राठोड, विनोद झापडे, विनोद शेले, गजानन वाख, अर्चना म्हात्रे, कल्पना नाफडे, गीता घाडी, कावेरी मॅडम उपस्थित होत्या. कार्यक्रमास ७ ते ९ वी चे ३५० विद्यार्थी उपस्थित होते.

## ‘रोटरी’च्या हायस्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**उरण : बातमीदार**

उरण रोटरी एज्युकेशन सोसायटीच्या रोटरी इंग्लिश मिडियम हायस्कुल व ज्युनिअर कॉलेजचा ३४वा वार्षिक स्नेहसंमेलन भव्य सोहळा मोठ्या उत्साहात रोटरी एज्युकेशन सोसायटीची रोटरी इंग्लिश मिडियम हायस्कुल व ज्युनिअर कॉलेजच्या मैदानावर बोरी उरण येथे झाला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ग्लोबल ऑऊट सोरसींग कंट्रोल्स लिडचे व ग्लोबल सिनिअर वाईस प्रेसिडंट, सिटी ग्रुपचे प्रसाद एस प्रधान उपस्थित होते. तसेच सन्माननीय अतिथी म्हणुन कॅप जेमिनीच्या वाईस प्रेसीडंट चित्रा एस दाते उपस्थित होत्या. कार्यक्रमाची प्रस्तावना संस्थेचे सचिव यतिन म्हात्रे व शाळेच्या प्रशासकीय अधिकारी पुष्पा कुरूप यांनी केले. मनिषा महाजन सदस्या यांनी प्रमुख पाहुण्याचे परिचय प्रस्तावना केली. संस्थेचे अध्यक्ष विकास महाजन यांनी प्रमुख पाहुणे प्रसाद एस प्रधान यांचे पुष्प गुच्छ, शाल व श्रीफळ देऊन स्वागत व सत्कार केले तसेच पूजा म्हात्रे सदस्या यांनी अतिथींचे परिचय प्रस्तावना केली व चित्रा एस. दाते यांचे शाळेच्या प्राचार्य अक्षता घरत यांनी पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन स्वागत व सत्कार केले. संस्थेचे विश्वस्त व माजी अध्यक्ष शेखर व्दा. म्हात्रे यांचे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच नवनिवार्चित अध्यक्ष विकास महाजन यांचेसुध्दा प्रमुख पाहुण्याच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान रोटरी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष विकास महाजन यांनी भुषवले होते. रोटरी इंग्लिश स्कुल व कॉलेजच्या मुलांनी संपूर्ण वर्षामध्ये केलेल्या शैक्षणिक प्रगती, क्रीडा, व विज्ञान प्रदर्शनामध्ये शाळेच्या मुलांनी नेत्रदीपक यश मिळवले होते त्याबद्दल त्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते, सन्माननीय अतिथी, शाळेचे पदाधिकारी, विश्वस्त व सदस्यांच्या हस्ते सत्कार व सन्मान करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष विकास महाजन यांनी भाषण केले आणि शैक्षणिक व क्रीडामध्ये यश मिळवलेल्या व सत्कार केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे त्यांनी कौतुक केले व अभिनंदन केले. प्राचार्य अक्षता घरत यांनी शाळेचा वार्षिक अहवाल पालकां समोर सादर केला.

कार्यकमास रोटरी एज्युकेशन सोसायटीचे जॉईंट सेक्रेटरी शेखर म्हात्रे, खजिनदार प्रसन्नाकुमार, विश्वस्त डॉ. बी.व्ही. देवणीकर व पालक शिक्षक संघटनेचे उपाध्यक्ष प्रिया थळी उपस्थित होत्या. या कार्यक्रमास पालकवर्ग व उरणच्या नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. कार्यक्रमाच्या अंतिम क्षणी मुख्याध्यापिका संजिता थळी यांनी उपस्थित कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, सन्माननीय अतिथी, संस्थेचे पदाधिकारी, उपस्थित मान्यवरांचे व पालकांचे आभार मानले तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक, कर्मचारी यांनी मेहनत घेतली.



**पनवेल : रयतसेवक को-ऑपरेटिव्ह बँक लि.वाशी शाखेच्या स्वीकृत संचालकपदी मनिषा महेश पाटील यांची नियुक्ती झाल्याबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी रायगड विभागीय अधिकारी आर.पी. ठाकूर, न्हावे विद्यालयाचे मुख्याध्यापक व लाईफ मेंबर पी.ए. कोळी, रयतसेवक संघाचे माजी व्हाइस चेअरमन नुरा शेख, वाशी बँकेचे चेअरमन किशोर पाटील, नवनीत ठाकूर, न्हावे ग्रामपंचायतीचे नवनिर्वाचित सरपंच विजेंद्र पाटील, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, जयवंत देशमुख, सी.एल. ठाकूर आदी उपस्थित होते.**

## ऐरोलीत विकसित भारत संकल्प यात्रेला प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

विकसित भारत संकल्प यात्रा उपक्रमाला नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात ठिकठिकाणी नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून २७ डिसेंबर रोजी दिघ्यापासून सुरू झालेली ही यात्रा १८ जानेवारीपर्यंत ४५ ठिकाणी केंद्र सरकार, राज्य शासन व नवी मुंबई महापालिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या लोककल्याणकारी योजनांचा प्रचार व प्रसार करीत आहे.

विकसित भारत संकल्प यात्रेच्या २९ डिसेंबर रोजीच्या दुसऱ्या दुपारी ३ ते ६ च्या सत्रात आमदार रमेश पाटील यांनी ऐरोली सेक्टर ८ ए पल रूग्णालयाजवळ यात्रास्थळी भेट देऊन विविध योजनांच्या स्टॉल्सची व तेथे सुरू असलेल्या कार्यवाहीची पाहणी केली आणि समाधान व्यक्त केले तसेच योजनांचा लाभ घेण्याचे उपस्थितांना आवाहन केले.

या वेळी परिमंडळ २ चे उपआयुक्त डॉ. श्रीराम पवार, माजी नगरसेवक जी.एस. पाटील, करण मढवी, सुरेश भिलारे तसेच इतर सामाजिक संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी विकसित भारत संकल्पाची सामुहिक शपथ ग्रहण करण्यात आली. या उपक्रमामध्ये २८० हून अधिक नागरिकांनी स्टॉल्सला भेटी देऊन योजनांची माहिती घेतली व मोठ्या संख्येने योजनांचे अर्ज भरून यात्रेचा लाभ घेतला.

अशाच प्रकारे ३० डिसेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी १ वा. च्या ऐरोली विभाग कार्यालय येथे झालेल्या सकाळच्या सत्रात ३७० नागरिकांनी उपस्थिती दर्शवून पीएमस्वनिधीपासून रक्त तपासणीपर्यंत विविध योजनांचा व आरोग्य सुविधांचा लाभ घेतला. याप्रसंगी माजी नगरसेवक मनोज हळदणकर, नंदा काटे, अंकुश सोनावणे आणि स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## स्नेहल माळीचे कौतुक अन् गौरव



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी यांची कन्या स्नेहल माळी हीने सायकलींग स्पर्धेत राज्यस्तरीय व राष्ट्रीय सुवर्ण, कास्य पदके प्राप्त केले आहेत. दत्त जयंतीच्या निमित्त रायगड जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे रसायनी पोलीस ठाण्यात आले असता स्नेहल माळीचे त्यांनी कौतुक करून गौरव केला. स्नेहल तू क्रिडा क्षेत्रात चांगले नावलौकिक करत असून तुझा आम्हाला अभिमान असल्याचे गौरोद्गार जिल्हा पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी काढले.

दरम्यान, स्नेहलचे महाराष्ट्र सायकलिंग स्पर्धेत स्थान पक्के झाले आहे. या वेळी स्नेहल माळीचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. स्नेहलता प्रताप जाधव सर उपाध्यक्ष सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया व श्री. साठे महाराष्ट्र सायकलिंग असोसिएशन व फेनिक्स सायकलिंग क्लब, पुणेचे दर्शन बारगुजे सर यांचे मार्गदर्शन लाभले.

दरम्यान, स्नेहल शत्रुघ्न माळी हिने याअगोदर रांची झारखंड येथे झालेल्या ५२ व्या राष्ट्रीय ट्रक सायकलींग अजिंक्यपद स्पर्धेत सिल्व्हर पदक पटकाविले. तर सर्व राज्य विजेते, भारतीय रेल्वे, आशियाई खेलो इंडिया खेलोमध्ये रौप्यपदक, स्नेहलचे राष्ट्रीय सायकलींग स्पर्धेत तिसरे पदक असून कुरुक्षेत्र येथे सुवर्णपदक पटकाविले आहे. तिच्या यशाबद्दल सर्व थरांतून स्नेहलवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## खारघर डोंगरावर प्रवेशबंदी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

नववर्ष स्वागतावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून खारघर डोंगरावर प्रवेश बंदी करण्यात आली होती. यासाठी पोलिसांनी पथक तयार केले असून एक दिवसासाठी ही बंदी होती.

खारघर आणि ओवे डोंगर हिरवाईने नटलेला आहे. खारघर परिसरातील बहुतांश मित्र मंडळी सुट्टीच्या दिवशी फेरफटका मारण्यासाठी डोंगर गाठतात. त्यात थर्टीफस्टसाठी हॉटेल, फार्महाऊस आदी स्थळ बुक झाल्याने दारूचे आणि खाद्यपदार्थांच्या दरात भरमसाठ वाढ झाली आहे. त्यामुळे काही मित्र मंडळी छुप्या मार्गाने ओवे डोंगरावर थर्टीफस्ट साजरा करण्याचा बेत आखला जातो, मात्र खबरदारीचा उपाय म्हणून खारघर पोलिसांनी डोंगरावर जाण्यास बंदी घातली होती. तसेच सिडकोच्या सुरक्षारक्षकांसमवेत पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## ज्येष्ठ समाजसेवक कै. शांताराम धुरव यांच्या पुण्यस्मरणनिमित्त विविध कार्यक्रम

**मोहोपाडा :** येथील ज्येष्ठ समाजसेवक कै. शांताराम आंबो धुरव यांचा प्रथम पुण्यस्मरण शुक्रवारी (दि. ५) दि.५ जानेवारी रोजी असल्याने धुरव कुटूंबियांच्यावतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

कै.शांताराम धुरव यांना मोहोपाडा रसायनी परिसरात नागरिक अण्णा नावाने ओळखत असत. त्यांचे परिसरातील सर्व कार्यक्रमांना मोलाचे स्थान असायचे. मोहोपाडा गावातील कार्यक्रमात स्वता:ला झोकून जबाबदारीने काम करायचे. त्यांच्या जाण्याने परिसरातील सामाजिक कार्यांत पोकळी निर्माण झाली आहे. त्याचा प्रथम पुण्यस्मरणानिमित्त गुरुवारी (दि. ४) रात्री ९ वाजता दत्त प्रासादिक भजन मंडळ मोहोपाडा आळी आंबिवली यांचे भजन होईल, तर शुक्रवारी (दि. ५) सकाळी ९ वाजता प्रतिमेचे पूजन, सकाळी १० ते ११ वाजता हभप आश्विनीताई म्हात्रे (संगमनेर) यांचे सुश्राव्य कीर्तन, दुपारी १ वाजता महाप्रसाद आदी कार्यक्रमांचे आयोजन त्यांच्या मोहोपाडा येथील राहत्या घरी करण्यात आले आहे.












# मुंबई-गोवा महामार्ग जाम!

## पर्यटनस्थळांकडील सर्वच मार्गांवर वाहनांच्या रांगा

**माणगाव : प्रतिनिधी**

शनिवार आणि रविवार, त्यातच थर्टीफस्टची फोडणी यामुळे मुंबई-गोवा महामार्गावर पहाटेपासून पर्यटकांचे लोंढे कोकणातील पर्यटनस्थळाकडे ओथंबून वाहू लागले. यामुळे माणगाव बाजारपेठेसह सर्वच पर्यटनस्थळांकडे जाणारे जाणारे मार्ग वाहनांनी तुंबले.



पर्यटकांचे आकर्षण ठरलेली रायगड जिल्ह्यातील विविध प्रेक्षणीय व पर्यटनस्थळे हाऊसफुल झाली आहेत. गेल्या आठ दिवसांपासून कोकणात पर्यटकांचे थवे निसर्गाचा मुक्तपणे आस्वाद घेण्यासाठी व कोंडलेल्या मनाला मोकळी वाट करून देण्यासाठी विविध ठिकाणी दाखल होत आहेत. त्यामुळे मुंबई-गोवा महामार्गावर पुणे-दिघी मार्गावरील माणगाव हे ठिकाण महत्त्वाचे असून या मार्गावर गेले आठ दिवस सतत वाहतुकीची कोंडी होत आहे. ही कोंडी सोडविण्यासाठी पोलिसांची झोप उडाली असून दमछाक झाली आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील महत्त्वाचे शहर म्हणून माणगावकडे पाहिले जाते. या शहरातून तळकोकणात जाणारा महामार्ग आहे. मुंबईकडून कोकणात व तळकोकणात जाणाऱ्या प्रवासी, पर्यटकांना मुंबई- गोवा महामार्ग जवळचा व सोयीस्कररित्या सोपा वाटतो. दुसरा मार्ग पुणेकडून आहे. मात्र तो लांब पडत असल्यामुळे अनेक प्रवासी, पर्यटक त्यामार्गे प्रवास सहसा करीत नाहीत.

माणगाव बाजारपेठेतून हा मार्ग जात असल्यामुळे दिवसेंदिवस वाहतूक वाढली आहे. पर्यटक मोठ्या प्रमाणात कोकणात जात असताना रस्त्याच्या कडेला असणारी टपऱ्या, छोटे उद्योजक आणि महामार्गावरून प्रवास करणारे प्रवासी, पर्यटक ही आपली वाहने रस्त्यालगत उभी करून बाजारात लहान मोठी खरेदी करीत असतात. त्यामुळे मुंबई-गोवा तसेच दिघी-पुणे मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनांना अडथळा निर्माण होतो.

थर्टीफर्स्टमुळे पर्यटकांनी आपली कूच रायगडसह संपूर्ण कोकणाकडे मोठ्या संख्येने केली. मुंबई, ठाणे, वसई, पुणे तसेच पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भातून पर्यटक, प्रवासी रायगड जिल्ह्यात दाखल झाले आहेत, तर काही प्रवासी प्रवासातच अडकले. प्रचंड प्रमाणात पर्यटकांनी हजेरी लावल्यामुळे इथल्या वाहतूक कोंडीवर मोठा परिणाम झाला. तासन्तास प्रवासात रस्त्यावरच पर्यटक, प्रवाशांना अडकून पडावे लागले. त्यामुळे वाहतूक पोलिसांचीही तारांबळ उडाली.

# नागोठण्यात कलश यात्रेस नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**नागोठणे : प्रतिनिधी**

आयोध्या नगरीमध्ये प्रभू रामाच्या मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा २२ जानेवारी २०२४ रोजी होत असल्याच्या अनुषंगाने श्री राम जन्मभूमी तीर्थक्षेत्र अयोध्या नगरीतून अभिमंत्रित अक्षता नागोठण्यात आल्या. ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता मंदिरात आरती करून अक्षता वाहून कलश यात्रा काढण्यात आली.



या कलश यात्रेला नागोठणे नगरीत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कलश यात्रेचे ठिकठिकाणी जोरदार स्वागत करण्यात आले. कलश यात्रेत भाजप तालुका सरचिटणीस आनंद लाड, किशोर म्हात्रे, एकनाथ ठाकूर, शहर अध्यक्ष सचिन मोदी, जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे, शिवसेना जिल्हा सहसंपर्कप्रमुख किशोर जैन, मनसे नेते गोवर्धन पोलसानी, जोगेश्वरी देवस्थान विश्वस्त समिती सचिव भाई टके, सरपंच सुप्रिया महाडिक, माजी सरपंच विलास चौलकर, सदस्य डॉ. मिलिंद धात्रक, ग्रामपंचायत सदस्य सुप्रिया काकडे, भाविका गिजे, मनोज धात्रक, हभप बापूमहाराज रावकर, विवेक रावकर, सुरेश जैन, शेखर गोळे, चेतन कामथे, उदंड रावकर, रोहिदास हातनोलकर, गणेश घाग, नितीन राऊत, केदार कुंटे, महादेवसिंग परदेशी, नामदेव नाईक, सुभाष जैन, संजय नांगरे, भरत गिजे, शंकर ठाकूर, धनराज उमाळे, तिरत पोलसानी, सागर सुकाळे, संदेश सुकाळे, अमित पवार, पोलीस निरीक्षक संदीप पोमन आदींसह महिलावर्ग व नागरिक बहुसंख्येने सहभागी झाले होते.

दरम्यान कलश यात्रा जैन मंदिरात आल्यानंतर देवकीर्तिसुरिश्वर, रत्नकीर्ति, प्रसन्नवर्धनाश्री या स्वामींनी स्वागत करून मार्गदर्शन केले.

कलश यात्रा गावातील विविध मंदिरात नेण्यात आली व मंदिरात अक्षता वाहण्यात आल्या. दरम्यान १ जानेवारीपासून १५ दिवस गृहसंपर्क अक्षता वितरण कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती श्री राम मंदिर न्यास जिल्हा प्रचारक संदीप राठोड यांनी दिली.

अक्षता कलश यात्रा यशस्वीपणे राबविण्यासाठी मंदार परांजपे, उपखंड प्रमुख कैलाससिंग परदेशी, कार्यवाहक मयूर वाघमारे यांनीही अथक मेहनत घेतली.



# बोरघाटात वाहतूक सुरळीत

## वाहतूक पोलिसांचे यशस्वी नियोजन

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

शनिवार, रविवार अशा सलग सुट्ट्या आणि त्यात थर्टीफर्स्टचा फिव्हर यामुळे बरेचसे लोक विविध पर्यटनस्थळी जाण्यासाठी घराबाहेर पडले आहेत. त्यामुळे मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर लहान वाहने त्यातही कारच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. या दरम्यान खंडाळा घाटामधील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी वाहतूक शाखेकडून घाट सुरू होण्यापूर्वी जड व अवजड वाहनांना थांबविण्यात आले व वाहतूक कोंडी संपल्यानंतर त्यांना टप्याटप्याने मार्गस्थ करण्यात आले. याचा योग्य परिणाम होऊन रविवारी वाहतूक कोंडी सामान्य ठेवण्यात यंत्रणेला मोठ्या प्रमाणावर यश आले.



मागील वाहतूक कोंडीचे परीक्षण व अभ्यास करून खंडाळा घाट परिक्षेत्र वाहतूक शाखा, पोलीस निरीक्षक योगेश भोसले यांनी शनिवारी व रविवारी जड व अवजड वाहनांना टप्याटप्याने सोडण्याचा निर्णय घेऊन तो यशस्वीपणे राबविला. मागील शनिवारी २४ तासांमध्ये ५५,८६८ वाहने द्रुतगती महामार्गावरील पुणे वाहिनीवरून गेली होती तसेच मुंबई-पुणे जुना महामार्गावरून २१,१३५ वाहने गेली होती. दोन्ही मार्गांवरील वाहनांना खंडाळा घाटात एकच संयुक्तिक मार्गाचा वापर करावा लागतो. इतक्या प्रचंड प्रमाणात वाहने आल्यानंतर घाटामध्ये वाहतूक कोंडी होते. या कोंडीचा फटका प्रवाशांना तर बसतोच, पण मोठ्या प्रमाणावर वाहनांच्या क्लज प्लेट, ब्रेक नादुरुस्त होऊन वाहने रस्त्यावर बंद पडून वाहतूक कोंडीत भर पडत असल्याचे वारंवार होणाऱ्या कोंडीतून स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर ३० डिसेंबरपासून ३१ डिसेंबर वर्षाचा शेवटचा दिवस व १ जानेवारी वर्षाचा पहिला दिवस या तीन दिवस कोंडी टाळण्यासाठी जड वाहनांसाठी वेळापत्रक ठरविण्यात आले व ते यशस्वी होत आहे.



दरम्यान, वर नमूद दिवशी मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर पुणे वाहिनीवरील प्रवास दुपारी १२नंतर सुरू केल्यास अशा जड वाहनांना घाटामध्ये थांबण्याची गरज पडणार नाही तसेच वाहतूक कोंडीमुळे वाहनांचे क्लच प्लेट जाणे, इंजिनचे काम निघणे इत्यादी टळू शकेल आणि इंधन व वेळची बचत होईल हे सांगून जड-अवजड वाहनधारक व चालकांनी वाहतूक शाखा व खंडाळा घाट वाहतूक नियंत्रण यंत्रणांना सहकार्य करण्याचे आवाहन पोलीस निरीक्षक योगेश भोसले यांनी केले आहे.

# वरसई येथे अपघातात दुचाकीचालक जागीच ठार

**पेण : प्रतिनिधी**

वरसई फाटा ते वरसई रस्त्यावरील वरसई गावाच्या हद्दीत एसटी बस आणि दुचाकी यांची समोरासमोर धडक होऊन दुचाकीचालक चंद्रकांत वाघमारे (वय ३२, रा. पानेड) जागीच ठार झाला.

याबाबत श्रीकांत सुरेश वाघमारे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार एसटी बस पेणहून वरसईच्या दिशेने जात होती, तर दुचाकी चालक चंद्रकांत वाघमारे हा पेणच्या दिशेने जात होते. वरसई गावाच्या हद्दीत दोन्ही वाहनांची समोरासमोर धडक झाली. ही धडक इतकी जोरदार होती की दुचाकी चालक जागीच ठार झाला

या अपघाताची माहिती समजताच परिसरातील ग्रामस्थ, युवक घटनास्थळी दाखल होत मदतकार्य सुरू केले तसेच अपघातग्रस्तांचे मदतगार मावळा प्रतिष्ठानचे सभासद यांनी घटनास्थळी धाव घेत अपघातग्रस्तांना मावळा प्रतिष्ठानच्या रुग्णवाहिकेतून रुग्णालयात दाखल केले. या प्रकरणी बस चालकाविरोधात पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कोलाड हायस्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

## सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव –अजित साबळे

**धाटाव : प्रतिनिधी**

कोलाड येथील द.ग. तटकरे हायस्कूलने सांस्कृतिक कार्यक्रमाला मानवता ही थीम दिली. यातून भविष्यात चांगले विद्यार्थी घडतील. चला जग सुंदर करूया हा सुविचार देत मानवतेचा संदेश देत सर्व विद्यार्थ्यांमध्ये रूजावा म्हणून शाळेने केलेला प्रयत्न मोलाचा आहे. अशा सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो, असे प्रतिपादन कोलाडचे पोलीस निरीक्षक अजित साबळे यांनी केले.




सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कोलाड येथील द.ग. तटकरे माध्यमिक व उच्च माध्यमिक हायस्कूल येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात झाले. त्या वेळी पोलीस निरीक्षक साबळे बोलत होते.

या कार्यक्रमास राष्ट्रवादी महिला तालुका अध्यक्ष प्रीतम पाटील, राष्ट्रवादी युवक समन्वयक राकेश शिंदे, कोलाड हायस्कूलचे मुख्याध्यापक सुखदेव तिरमले, माजी मुख्याध्यापक शिरीश येरुणकर, माजी सरपंच संजय मांडलुसकर, श्रीकांत चव्हाण, गणेश वाचकवडे, उपमुख्याध्यापक एम.डी. देशमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी आनंद व्यक्त केला.

**कोलाड हायस्कूलने तालुका, जिल्हा, राज्य व देशपातळीवर क्रीडा स्पर्धेत नाव कमावले. कोलाडसारख्या ग्रामीण भागात सुरुवातीला शिक्षणाचे छोटेसे रोपटे लावले. आज या रोपाट्याचा वटवृक्ष झालेला पहायला मिळत आहे.**

**–सुखदेव तिरमले**, मुख्याध्यापक

**कोलाड, आंबेवाडी ग्रामपंचायतीत काम करीत असताना कोलाड हायस्कूलच्या विद्यार्थ्यांमध्ये रममाण झाले. विद्यालयात मी शिक्षण घेतले नसले तरी नेहमीच जवळचे नाते निर्माण झाले.**

**–प्रीतम पाटील**, तालुकाध्यक्ष, महिला राष्ट्रवादी काँग्रेस

# अखेरचा हा तुला दंडवत...!

## लाडवली पुलाला भावूक निरोप

**महाड : प्रतिनिधी**

निर्जीवालाही सजीव व्हावंस वाटेल असा एक आगळावेगळा निरोप समारंभ रविवारी (दि.३१) पार पडला. तब्बल पन्नास वर्षे अविरत सेवा देणाऱ्या किल्ले रायगड मार्गावरील लाडवली पुलाला ग्रामस्थांनी अखेरचा निरोप दिला. या प्रसंगी भावूक होऊन प्रत्येकाने आपल्या आठवणी कथन केल्या.



भारतीय संस्कृतीमध्ये सजीव आणि निर्जीव या सर्वांमध्ये परमेश्वर पाहिला जातो. याच भावनेतून महाड ते किल्ले रायगड मार्गावरील लाडवली या पुलाच्या अखेरचा निरोप समारंभ करण्यात आला. १९७४ साली महाडचे ठेकेदार नानकाभाई यांनी हा पूल बांधला होता. कालांतराने किल्ले रायगड मार्गाचे महामार्गात रूपांतर झाले व त्याच्या काँक्रीट रुंदीकरणाच्या कामाला सुरुवात झाली. याच कामाचा भाग म्हणून लाडवलीचा हा पूल पाडून या ठिकाणी भव्य असा काँक्रीटचा गर्डर टाईप पूल बांधला जाणार आहे. यासाठी या आठवड्यात हा जुना पूल पाडण्यात येणार आहे. या पुलाशी भावनिक नाते जुळले असल्याने रविवारी सकाळी रायगड विभागवासीयांच्या वतीने या पुलाचा निरोप समारंभ करण्यात आला. या वेळी पुलाच्या प्रतिमेला हार व नारळ वाढवून पुलाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमास राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त प्रभाकर भुस्कुटे, रघुवीर देशमुख, निसार ढोकले, प्रवीण धोत्रे, चंद्रजित पालांडे, ज्येष्ठ नागरिक मनोहर शिंदे, डॉ. नितीन मिंडे, पत्रकार महेश शिंदे, पोलीस पाटील इलियास ढोकले, साहदत ढोकले, राजन सुळे, समीर देशमुख, मनिषा शिंदे, प्रकाश सुतार, शंभू यादव, रामानंद यादव, भैया वडके, शैलेश बुटाला, मंगेश शिंदे, मिलिंद देशपांडे, एस.बी. सुरवासे, बापू मोहिते, भारती शिंदे, शिल्पा शिंदे यांच्यासह असंख्य नागरिक उपस्थित होते. मान्यवरांनी पुलाप्रति आपल्या भावना व्यक्त केल्या.

### मान्यवरांनी व्यक्त केल्या भावना

*या वेळी शिवभक्त रघुवीर देशमुख यांनी हा पूल किल्ले रायगडचा दुवा होता व तो दुवा आता हरपणार आहे, असे उद्‌गार काढले. प्रवीण धोत्रे यांनी रायगड विभागातील प्रत्येक नागरिकाच्या जिवनाचा हा पूल एक अविभाज्य भाग होता, असे म्हटले. ज्येष्ठ नागरिक मनोहर शिंदे यांनी या पुलाचे बांधकाम होताना आपण पाहिले. या पुलाचे ठेकेदार नानकाभाई हे सायकलने यायचे. त्यामुळेच या पुलाचे काम दर्जेदार झाल्याचे नमूद केले. डॉ.नितीन मिंडे यांनी आजच्या या निरोप समारंभामुळे हेच समजते की या पुलाप्रति नागरिकांचे एक वेगळेच नाते आहे. महेश शिंदे यांनी या पुलावरून बैलगाडीपासून राष्ट्रपती सर्वांनी प्रवास केला. त्यामुळे हा पूल शिवरायांचा खरा शिलेदार असल्याची भावना व्यक्त केली, तर निसार ढोकले यांनी लाडवली ग्रामपंचायतीच्या वतीने सर्वांचे आभार मानून पुलाप्रति कृतज्ञता व्यक्त केली.*

# 'पत्रकारांनी चौकसवृत्ती बाळगावी'

**खालापूर : प्रतिनिधी**

पत्रकारांना समाजाचा आरसा म्हटले जाते. त्यामुळे पत्रकारांनी कायम जागरूक आणि चौकस राहणे आवश्यक असून विविध क्षेत्रांतील ज्ञान वाढवल्यास पत्रकारिता आणखी समृद्ध होईल, असे मत ज्येष्ठ पत्रकार अरुण नलावडे यांनी काढले.

पत्रकार अमोल पाटील यांनी पत्रकारितेचा डोलारा सांभाळताना कायद्याची पदवी संपादन केली आहे. याबद्दल त्यांच्या सत्कार करण्यात आला. त्या वेळी नलावडे बोलत होते.

मागील काही वर्षांत पत्रकार क्षेत्रात नवेदित पत्रकार संख्या वाढली आहे. जुजबी ज्ञान घेऊन होणारी पत्रकारिता ज्ञान मर्यादित ठेवते. अशा परिस्थितीत अमोल पाटील यांनी मौलिक असणारी कायद्याची परीक्षा उत्तीर्ण होत व्यासंग वाढवला आहे.

या कार्यक्रमास पत्रकार दिलीप पवार, अनिल वाघमारे, हनुमंत मोरे, मनोज कळमकर, अर्जुन कदम, विकी भालेराव, दत्ता शेडगे, दीपक जगताप आदी उपस्थित होते. सर्वांनी पाटील यांना शुभेच्छा दिल्या.



# अक्षता कलश यात्रा









































दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com